# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०२६
पृष्ठे ६८  किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक पाचवा

## सुट्टीची सारी मौजमजाच न्यारी
## बालसाहित्यासंगे घेऊ भरारी...



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦ मे २०२६ ♦ वर्ष सव्विसावे ♦ अंक पाचवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस


## – अनुक्रमणिका –

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्य वार्ता | १० |
| उपक्रम | १२ |
| श्रद्धांजली | १४ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| पावसात न भिजण्याची युक्ती | १६ |
| हॅच्युकीसुनास्की | २२ |
| हाटूमुटूचा चंद्र | ३० |
| हत्ती गट्टी गंमत गोष्टी | ३८ |
| हरवलेल्या कर्णफुलांचे रहस्य | ४४ |
| असुरकथा | ५२ |
| दिनविशेष | ६२ |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ I E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## बालसाहित्य
## चिरंतन ऊर्जेचा आणि चैतन्याचा झरा

मेहता मराठी ग्रंथजगतचा हा ‘बालसाहित्य’ विषयक अंक वाचकांसमोर ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. मराठी साहित्यक्षेत्रातल्या विविध साहित्यप्रकारांपैकी सकस आणि समृद्ध असा एक साहित्यप्रवाह म्हणजे, ‘बालवाङ्मय.’ या साहित्यप्रकाराचा ‘स्वतःचा’ असा विशिष्ट आयाम आहे; परीघ आहे. मराठी साहित्यक्षेत्रात ‘बालवाङ्मय’ या साहित्यप्रकाराची रुजवात खूप आधीपासूनच झालेली दिसते. खरंतर, प्रथितयश साहित्यिकांपासून ते अगदी नवोदितांपर्यंत काहींनी या साहित्यप्रवाहात आपलं योगदान दिलं आहे आणि बालवाङ्मयाचं दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

नेमकं काय आहे बरं त्यात? तर, ‘मुलांचं, मुलांसाठीचं साहित्य’ असं म्हणताना लेखनाचे बारीकसारीक कंगोरे लेखकांनी त्यात व्यक्त केल्याचं दिसतं. उदाहरणादाखल सांगायचं



तर, पुस्तकाची कथावस्तू, आशय-विषय मांडणी, लेखनशैली अशा सर्व घटकांमध्ये वैशिष्ट्यपूर्णता आहे. परिणामी, यामध्ये वैविध्यही आढळतं. अभिव्यक्तीच्या दृष्टीने सोपी भाषा दिसते. चित्रांमधली समृद्धता लक्षात येते. वाङ्मयीन स्तरावर ही वैशिष्ट्यं प्रकर्षाने जाणवतात. मात्र, आशयस्पष्टतेच्या स्तरावरही ही पुस्तकं बरंचकाही सांगतात. नाही का! म्हणजे, सांगायचंच झालं तर, अगदी सुरुवातीच्या काळातली 'हितोपदेश' अथवा 'इसापनीती'सारखी पुस्तकं थेट उपदेश करणारी होती. अगदी लहान मुलांशी चित्रांतून संवाद साधणारी पुस्तकं ही लहान मुलांच्या त्या-त्या जाणिवा विकसित करतात. त्यातून ती मुलं नकळतच भाषिकदृष्ट्या संपन्नतेकडे वाटचाल करतात. तसंच, विविध प्रकारची चरित्रं, कल्पनारम्य कथा मांडणाऱ्या पुस्तकांतून अद्वितीय व अविस्मरणीय अशी पात्रं वाचकांना भेटतात. यांमधून मुलांमध्ये कल्पनाशक्ती, जिज्ञासा विकसित होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे, मानसिकदृष्ट्या विविध पैलूंचा- सहानुभूती, नातेसंबंध, विविध भावभावना यांचा विशिष्ट प्रकारे विचार करण्याची क्षमता त्यांच्याठायी रुजते. या सर्वांतून मुलांची 'वाचक' म्हणून जडणघडण होत जाते. परिपूर्ण व्यक्तित्वाच्या दिशेने त्यांचा प्रवास होतो.

या अनुषंगाने, मेहता पब्लिशिंग हाऊसचं ग्रंथदालन बालसाहित्याने परिपूर्ण व समृद्ध आहे. त्यात चित्रमय गोष्टींपासून कुमारवयातील बालवाचकांसाठीच्या पुस्तकांचा समावेश आहे. त्यामध्ये अनुवादित साहित्यही दिसतं. हे समग्र बालवाङ्मय मुलांवर नैतिकदृष्ट्या संस्कार करणारं आहे. आकलनात्मक पातळीवरची सहज-सोपी भाषा हे त्याचं वैशिष्ट्य आहे. ही पुस्तकं प्रेरणादायी आहेत. त्याचप्रमाणे, दर्जेदार छपाई आणि चित्रांचा प्रभावी वापर ही पुस्तकनिर्मितीच्या दृष्टीने अधोरेखित करण्याजोगी वैशिष्ट्यं सांगता येतात. 'बालवाङ्मय' या साहित्यप्रकाराची अशी सर्वच वैशिष्ट्यं लेऊन मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनेक लेखक-लेखिकांच्या; अनुवादकांच्या साहित्यकृती उतरतात. त्यांत लोकप्रिय व प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्तींच्या पुस्तकांचा समावेश आहे. त्यांपैकी, 'आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी'मध्ये त्यांनी अद्भुत विश्वाची सफर घडवली आहे. 'गोपीची डायरी'मध्ये गोपी नावाच्या कुत्र्याची व त्याला दत्तक घेऊन सांभाळणाऱ्या प्रेमळ कुटुंबाची कहाणी चित्रित झाली आहे. नुकतंच प्रकाशित झालेलं

‘हरवलेल्या कर्णफुलांचे रहस्य’ हे पुस्तक रोमांचक कथेतून इतिहासाचे कंगोरे उलगडत जाणारी लहानग्यांसाठीची कहाणी मांडतं. त्याचप्रमाणे, ‘थैलीभर गोष्टी’, ‘सुधा मूर्तींच्या बालकथा’ अशी अनेक पुस्तकं ही सकस वाचनानुभव देणारी आहेत. एकूणच, ‘दमदार आणि खुसखुशीत पुस्तकं’ असं सुधा मूर्तींच्या साहित्यकृतींबाबत म्हणता येतं.

मराठी साहित्यविश्वातले प्रसिद्ध लेखक डॉ.आनंद यादव यांचं ‘सैनिक हो, तुमच्यासाठी’ हे अतिशय वेगळं व वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक. भारत-पाक युद्धात विशेष पराक्रम गाजवलेल्या सैनिकांची पराक्रम-गीतं त्यात आहेत, जी सदैव प्रेरणादायी आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचं दर्शन घडवणारं हे पुस्तक आहे.

जागतिक कीर्तीचे लोकप्रिय लेखक जेफ्री आर्चर यांच्या बालकथा प्रभावी वाचनानुभव देणाऱ्या आहेत. ‘बाय रॉयल अॅपॉइन्टमेन्ट’, ‘विली आणि खुनी किपर’ व ‘विलीची चौकोनी जगाची सफर’ यांद्वारे त्यांनी चमत्कृतिपूर्ण जगाची रोमहर्षक सफर घडवली आहे. तर, डेबोरा एलिस यांची ‘टू ब्लु’ ही कादंबरी तारुण्याच्या उंबरठ्यावरील मुलीचं द्विधा मनःस्थितियुक्त भावविश्व रंगवते.

लेखिका व अनुवादिका मंजूषा आमडेकर यांचं अनुवादित बालसाहित्य ‘संग्रही असावं’ असंच आहे. त्यात ‘फ्रँकलिन मालिका’ आहे. ‘कांगारू देशीच्या गोष्टी’ हा पुस्तकसंच आहे. त्याचप्रमाणे, जागतिक कीर्तीचे लेखक विल्यम शेक्सपिअर यांची कुमारांसाठीची २२ पुस्तकं त्यांनी मराठीत आणली आहेत.

‘गंमतकोडी(भाग १ ते ५)’ यातून मुलांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळते. तसंच, डॉ.अरुण मांडे, डी.एस.इटोकर, निरंजन घाटे, प्रा. डॉ.चंद्रकांत सहस्त्रबुद्धे, एकनाथ आव्हाड, फारुक एस. काझी, शरद दळवी, वृषाली पटवर्धन यांसारख्या लेखकांच्या पुस्तकांनी आमचं ग्रंथदालन समृद्ध केलं आहे. तसंच, शेवडे गुरुजी यांची ‘चरित्र मालिका’ वाचनाचा आनंद तर देतेच; पण ती ज्ञानसंपन्न करणारी अशी आहे. डॉ.किशोर पवार व नलिनी पवार यांनी ‘आपली सृष्टी’मालिकेद्वारे प्राणिसृष्टीतील समस्त जीवित व नामशेष प्राणी, पक्षी, उभयचर आणि जलचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी सफर बालवाचकांना घडवली आहे. तर, लहानग्यांसाठीच्या ‘चित्रमय बोधकथा’, ‘विक्रम-वेताळ मालिका’, ‘अकबर-बिरबल मालिका’,

‘ससोबा-हसोबा मालिका’, ‘बब्बड मालिका’ या निखळ वाचनानुभव देणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणे, राजीव तांबे यांचं बालसाहित्य हलकाफुलका वाचनानुभव देतं. ‘पुस्तक वाचणारं फुलपाखरू’ यामध्ये अन्वय आणि त्याला भेटलेलं फुलपाखरू यांची सुंदर कथा आली आहे. त्यांची, ‘बंटूचा टिकटिक मित्र’, ‘अजब डोंगर आणि इतर कथा’, ‘राजाचा घोडा आणि इतर कथा’ ही पुस्तकंही संग्रही असावीत, अशीच आहेत.

तसंच, ‘माझी जीवनयात्रा’, ‘जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस’, ‘चेस युवर ड्रीम्स’, ‘स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला शास्त्रज्ञ’ ही चरित्रपर पुस्तकं कुमार वाचकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहेत.

विशेष उल्लेखनीय बाब अशी की, आमचं ग्रंथदालन आणखी समृद्ध करणारं नवंकोरं बालसाहित्य वाचकांच्या भेटीस येत आहे. त्यामध्ये- ‘गंमतकोडी(भाग ६ ते १०)’, ‘आत दडलेला शत्रू’, ‘हत्ती गट्टी गंमत गोष्टी’, ‘हॅच्युकीसुनास्की’, ‘हाटूमुटूचा चंद्र’ आणि ‘पिवळीधमक सगुणाबाई’ या पुस्तकांचा समावेश आहे. रंजकतेसह निखळ वाचनानुभव देणारी ही पुस्तकं आहेत. इतर पुस्तकांप्रमाणेच, ही पुस्तकंही वाचकांच्या मनाचा ठाव घेतील, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

अशा रीतीने, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात बालवाङ्मयाचा परिपूर्ण ठेवा आहे. विशेषतः, बालवाचकांनी ही पुस्तकं वाचून स्वतःच्या व्यक्तिमत्त्व-विकसनासह ‘माणूसपणा’च्याही जाणिवा समृद्ध करायला हव्यात. त्यातूनच आपल्या भविष्याची दिशा निश्चित केली पाहिजे; कारण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात वाचनप्रक्रिया आणि पुस्तकं ही आपल्या कुटुंबाशी, समाजाशी, देशाशी आणि जगाशीही आपला धागा बांधून ठेवणारी आहेत. म्हणूनच, हा कालातीत अनुबंध आहे. त्यामुळे, ऊर्जेचा आणि चैतन्याचा झरा असलेल्या ‘बालवाङ्मया’सारख्या साहित्यप्रवाहाद्वारे तो दृढ करणं, ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

अखिल
मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# साहित्य वार्ता

मराठी साहित्यविश्वातील ज्येष्ठ व श्रेष्ठ ग्रामीण कथाकार व्यंकटेश माडगूळकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कथांवर आधारित ‘गोष्टीवेल्हाळ तात्या’ हा कार्यक्रम शनिवार, दिनांक १८ एप्रिल, २०२६ रोजी संपन्न झाला. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात झालेल्या या कार्यक्रमाची निर्मिती ‘लपझप प्रॉडक्शन’तर्फे करण्यात आली. त्याचं संहिता-लेखन आणि दिग्दर्शन अक्षय वाटवे यांचं होतं. तर, कथांचं अभिवाचन अक्षय वाटवे आणि माधवी तोडकर यांनी केलं. या वेळी त्यांनी व्यंकटेश माडगूळकर यांच्या ‘मारुतीराय’, ‘धर्मा रामोशी’, ‘बाजार’ आणि ‘गोष्ट’ या चार कथांचं अप्रतिम सादरीकरण केलं.


या कार्यक्रमास मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता व साहिल मेहता उपस्थित होते. तसंच, रसिक वाचकांचीही उपस्थिती या कार्यक्रमास लाभली.

# करवीर नगरीत ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या ग्रंथदालनाचं उद्‌घाटन

मराठी प्रकाशनविश्वातली अग्रगण्य प्रकाशनसंस्था ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ यांचं अत्याधुनिक ग्रंथदालन कोल्हापूर येथे साकारलं आहे. त्याचा उद्‌घाटन समारंभ शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल रोजी राजारामपुरी येथे संपन्न झाला. खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते ग्रंथदालनाचं उद्‌घाटन करण्यात आलं. या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता व साहिल मेहता उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज यांनी उद्‌घाटनपर व्यक्त केलेल्या आपल्या मनोगतात या ग्रंथदालनाला भरभरून आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी, वाचन चळवळीत मोलाचं योगदान देणाऱ्या व्यक्तींचा व सार्वजनिक ग्रंथालयांचा विशेष सन्मान छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते पुस्तके भेट देऊन करण्यात आला. त्यांमध्ये- आपटे नगर वाचन मंदिर (इचलकरंजी), रसिक रंजन ग्रंथालय (घुणकी), पूज्य साने गुरुजी ग्रंथालय (गडहिंग्लज) आणि तरुण भारत वाचनालय (आरदाळ) या ग्रंथालयांचा समावेश होता. तसंच, राजेंद्र घोडके, प्रकाश आमते, प्रा.श्रीकांत नाईक, उत्तम तळवार आणि एस.आर.कामत या वाचकांचा सन्मान करण्यात आला. या वेळी जिल्हा परिषद विद्यामंदिर (सडोली-दुमाला) या शाळेतल्या विद्यार्थ्यांनाही पुस्तकं भेट देण्यात आली. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

◆



## उपक्रम

# गोष्टींची सुट्टी

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने मे महिन्यात बालवाचकांसाठी ‘गोष्टींची सुट्टी’ हा विशेष उपक्रम राबवण्यात येणार आहे. विशेषतः, ५ ते १२ या वयोगटातल्या मुलांसाठी हा उपक्रम आहे. यामध्ये मुलांना लेखक-लेखिकांशी संवाद साधता येणार आहे. तसंच, त्यांच्याकडून गोष्टी ऐकण्याचा आनंद घेता येणार आहे. यामधून मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास साधला जाऊ शकतो. या वर्षी प्रस्तुत कार्यक्रमात प्रसिद्ध बालसाहित्यिक वैशाली कार्लेकर, हिमानी परांजपे आणि डॉ.संजय ढोले हे मान्यवर सहभागी होणार आहेत. अनुक्रमे - १६ मे रोजी वैशाली कार्लेकर, २३ मे रोजी हिमानी परांजपे आणि ३० मे रोजी डॉ.संजय ढोले- बालवाचकांशी संवाद साधतील. विशेष म्हणजे, दिनांक २३ मे रोजी होणाऱ्या कार्यक्रमात हिमानी परांजपे लिखित व अनुवादित ‘हत्ती गट्टी गंमत गोष्टी’ या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात येणार आहे. दरम्यान, या उपक्रमांतर्गत ९ मे रोजी प्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी मुलांशी संवाद साधला.

लहान मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने अतिशय स्तुत्य असा हा उपक्रम आहे. खासकरून, उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना पुस्तकांशी जोडण्यासाठी व सुट्टी मनोरंजक बनवण्यासाठी हा उपक्रम

आयोजित केला जातो. परिणामी, मनोरंजनातून मुलांचा विकास साधला जातो.  मुलांची सर्जनशीलता व एकाग्रता वाढीस लागते. त्यामुळे, भाषेचं ज्ञान आणि शब्दसंग्रह वाढवण्याच्या दृष्टीने सर्व बालवाचकांनी 'गोष्टींची सुट्टी' या उपक्रमात सहभाग नोंदवायलाच हवा.

# 'पुणे बाल पुस्तक-जत्रा'

लहान मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी आणि त्यांना अनोख्या विश्वात रमता यावं, यासाठी उन्हाळ्याच्या सुट्टीत दिनांक ३० एप्रिल ते ४ मे, २०२६ या दरम्यान 'पुणे बाल पुस्तक-जत्रे'चं आयोजन करण्यात आलं होतं. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते जत्रेचं उद्‌घाटन करण्यात आलं. पुणे पुस्तक महोत्सव, पुणे महानगरपालिका, समर्थ युवा फाउन्डेशन आणि संवाद, पुणे यांच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. स्वारगेट येथील गणेश कला-क्रीडा केंद्र येथे ही पुस्तक-जत्रा भरवण्यात आली. पुस्तक-प्रदर्शनाबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन आणि लहान मुलांच्या विकासासाठीचे कार्यक्रम यांचंही आयोजन या वेळी करण्यात आलं. यामध्ये शंभरपेक्षा अधिक पुस्तक-दालनांचा समावेश होता.

या पुस्तक-जत्रेत मुलांसाठी कविसंमेलन आणि लेखकांना भेटण्याची संधी हेही उपक्रम राबवले गेले. तसंच पपेट शो, जादूचे प्रयोग, गीतरामायण असेही कार्यक्रम संपन्न झाले. विशेष म्हणजे, मुलांना भारतीय वायुसेनेच्या कार्याची ओळख करून देणारा 'सलाम भारतीय वायुसेनेला' हा कार्यक्रम आणि मुलांमध्ये संविधानाविषयी जनजागृती करणारा 'स-संविधानाचा' हा बालनाट्याचा कार्यक्रम करण्यात आला. पुस्तक-जत्रेत सहभागी होणाऱ्या मुलांना खाऊ, तसंच एक पुस्तक भेट म्हणून देण्यात आलं.

या पुस्तक-जत्रेच्या आयोजनाबद्दल पुण्याच्या महापौर मंजूषाताई नागपुरे आणि 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे प्रमुख राजेशजी पांडे यांचे आभार, तसंच चंद्रकांतजी पाटील यांचेही आभार.

◆

# श्रद्धांजली

## संगीतविश्वातील 'अविस्मरणीय युगा'चा अंत



भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ-श्रेष्ठ, दिग्गज व लोकप्रिय गायिका आशा भोसले यांचं वयाच्या ९२व्या वर्षी १२ एप्रिल, २०२६ रोजी निधन झालं. गेली आठ दशकं त्यांनी आपल्या गाण्याने संगीतविश्वाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं, आपल्या आवाजाने प्रत्येकाच्या मनावर अधिराज्य गाजवलं. त्यांनी विविध भाषांमध्ये आणि संगीतप्रकारांमध्ये हजारो गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपट सृष्टीत ओ.पी.नय्यर, आर.डी.बर्मन, शंकर-जयकिशन, ए.आर.रहमान इ. दिग्गज संगीतकारांबरोबर त्यांनी काम केलं. तर मराठीत सुधीर फडके, राम कदम, विश्वनाथ मोरे, श्रीनिवास खळे इ. दिग्गज संगीतकारांबरोबर त्यांनी काम केलं. हिंदी-मराठी चित्रपटेतर गीतांबरोबरच नाट्यसंगीतासाठी त्यांनी अपूर्व योगदान दिलं. 'भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वांत अष्टपैलू गायिका' अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या भरीव सांगीतिक योगदानाबद्दल त्यांना अनेकविध पुरस्कारांनी सन्मानित केलं गेलं होतं. त्यामध्ये, 'पद्मविभूषण', 'दादासाहेब फाळके पुरस्कार' इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील व संगीतविश्वातील सुवर्णयुगाचा अंत झाला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

सच्चेपणा, बुद्धिचातुर्य व हजरजबाबीपणाचा दिलखुलास नजराणा




लेखक : **मंजूषा आमडेकर**

**किंमत : २७५/-रु. । किंमत : २७५/-रु. । किंमत : २५०/-रु.**

**पोस्टेज प्रत्येकी ५०/-रु.**

विज्ञानप्रेमी राजूच्या चातुर्यकथांची रंगतदार, सचित्र मालिका




लेखक : **डॉ. संजय ढोले**

**किंमत प्रत्येकी : २७५/-रु. । पोस्टेज प्रत्येकी ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




**पावसात न भिजण्याची युक्ती आणि इतर कथा**

**डॉ. सुनंदा कुलकर्णी**

अनुवाद :

**लीना सोहोनी**

पृष्ठे : १३६

किंमत : २२०

*रंगतदार कथांचा संग्रह*

### उंदीर बनलेला उंदीर

खूप-खूप वर्षांपूर्वी, एका घनदाट जंगलामध्ये एक ऋषी राहत होते. ते तिथे कठोर तपश्चर्या करत होते. कित्येक महिने पर्वतासनामध्ये दोन्ही पाय जुळवून आणि आपले दोन्ही हात डोक्यावर नमस्कारासारखे जोडून ते ध्यानस्थ उभे होते. त्यांनी तपश्चर्येला

सुरुवात केल्यापासून पाण्याचा एक थेंबसुद्धा प्राशन केलेला नव्हता. असे कितीतरी महिने लोटले; पण साधू महाराजांची कठोर तपश्चर्या सुरूच होती.

एक दिवस तिकडून एक चोरांची टोळी जात होती. साधू महाराजांना लुबाडण्याच्या इराद्याने ते चोर त्यांच्या जवळ आले; पण साधू महाराजांकडे तर चोरण्यासारखं काहीच नव्हतं. तरीसुद्धा चोरांना त्यांना तसंच तिथे सोडून जायचं नव्हतं. चोरांनी विचार केला, 'यांच्या अंगावर काही नसेल, तरी निदान त्यांच्या आश्रमात चोरण्यासारखी काहीतरी मौल्यवान वस्तू असेल.'

''काय रे, तुझ्या आश्रमात काय आहे?'' चोरांनी साधू महाराजांना दरडावून विचारलं; पण साधू महाराज आपल्या ध्यानधारणेत इतके मग्न होते की चोरांचे ते शब्द त्यांच्या कानांवर पडलेच नाहीत. आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, याची त्यांना सुतराम कल्पना नव्हती.

साधू महाराजांच्या त्या मौनाचा चोरांनी चुकीचा अर्थ घेतला. त्यांना वाटलं, 'आपल्याकडे दुर्लक्ष करून या साधूनं आपला अपमानच केला आहे.' त्याचा बदला घेण्यासाठी त्यांनी साधू महाराजांचे हात-पाय दोरखंडाने करकचून आवळून बांधले. त्यानंतर चोरांनी त्यांच्या आश्रमात जाऊन बरीच नासधूस केली. जरा वेळाने ते चोर तिथून निघून गेले. इकडे साधू महाराज अजूनही ध्यानस्थ होते. इथे काय घडलं आहे, याची त्यांना काहीही कल्पना नव्हती.

असे अनेक आठवडे लोटले. अखेर साधू महाराजांची तपस्या पूर्ण झाली. त्यांनी डोळे उघडले. त्यांना तहान लागली होती आणि पाणी प्यायचं होतं; पण त्यांना आपले हात-पायच

हलवता येईनात. त्यांना आपल्या आजूबाजूला कोणीही दिसेना. ‘आता आपण काय बरं करावं?’ अशा विचारात ते पडले.

इतक्यात, साधू महाराजांना त्यांच्या अवतीभवती एक उंदीर उड्या मारताना दिसला. तो उंदीर त्यांच्या जवळ आला. साधू महाराज मुद्दामच अतिशय निश्चल उभे राहिले. अचानक त्या उंदराने साधू महाराजांच्या पायाभोवती बांधलेला दोरखंड कुरतडण्यास सुरुवात केली. ते पाहून साधू महाराजांना अतिशय आनंद झाला.

काही तासांतच उंदराने तो दोरखंड पूर्णपणे कुरतडला आणि साधू महाराजांचे पाय मोकळे झाले. त्यानंतर साधू महाराज खाली बसले. मग त्या उंदराने त्यांच्या हातांचे दोरखंडसुद्धा कुरतडून त्यांचे हात मोकळे केले.

ते पाहून साधू महाराज अतिशय प्रसन्न झाले. इतक्या कठोर योगसाधनेनंतर त्यांना एक सिद्धी प्राप्त झाली होती. त्या सिद्धीचा वापर करून त्यांनी त्या उंदराचं रूपांतर एका तान्ह्या बालिकेमध्ये केलं.

साधूमहाराज त्या मुलीला घेऊन आपल्या आश्रमात गेले. तिथे त्यांनी त्या मुलीला स्वत:च्या पोटच्या मुलीप्रमाणे वाढवलं, तिचं संगोपन केलं आणि तिला लहानाचं मोठं केलं.

अशी कित्येक वर्षं गेली. ती मुलगी आता मोठी झाली होती. ती उपवर झाली होती. एक दिवस साधू महाराजांनी तिला विचारलं,

‘‘बाळा, तुला कशा प्रकारचा पती हवा बरं? तुला पती म्हणून राजा हवा की ऋषी? शेतकरी हवा की कलाकार? का तुला एखादा उद्योगपती हवा आहे?’’

त्यावर ती मुलगी म्हणाली, ''मला अशा कुणाशी तरी विवाह करायचा आहे जो अत्यंत सामर्थ्यशाली असेल.''

तेव्हा तिला आपल्या पूर्वजन्माची आठवण झाली. 'आपण एक छोटासा उंदीर होतो,' याचं तिला स्मरण झालं आणि ती म्हणाली, ''म्हणजे उदाहरणार्थ एखादं मांजर.''

''का बरं?'' साधू महाराजांनी आश्चर्याने विचारलं.

''अहो, मी जेव्हा पूर्वायुष्यात उंदीर होते ना, तेव्हा एका मांजराने माझ्या सगळ्या मित्र-मैत्रिणींना आणि माझ्या घरच्या माणसांना खाऊन टाकलं होतं. त्यामुळे मांजरं ही उंदरांपेक्षा अत्यंत बलिष्ठ असतात, हे मला माहीत आहे. मला माझा पती म्हणून कोणीतरी बलवान हवंय.''

''अगं, पण कुत्रे मांजरांचा पाठलाग करतात आणि त्यांना मारून टाकतात,'' तिचे वडील म्हणाले.

''मग मला त्याच्याहूनही बळकट असं कोणीतरी हवं, उदाहरणार्थ एखादा कुत्रा,'' ती म्हणाली.

''अगं, पण कुत्र्याला कोल्हा मारू शकतो, हे तुला माहीत आहे ना?'' साधूमहाराज म्हणाले.

''मग मला कोणीतरी कोल्ह्यासारखं बलवान हवं,'' ती म्हणाली.

''अगं, पण सिंह कोल्ह्यांना मारू शकतात,'' तिचे वडील म्हणाले.

''मग मला सिंहासारखं कोणीतरी हवं,'' ती मुलगी अधीरतेने ओरडून म्हणाली.

''पण हत्ती सिंहाचा अगदी लीलया पाडाव करू शकतो. तो सिंहाला आपल्या पायाखाली चिरडून टाकतो,'' साधू महाराज

म्हणाले.

‘‘आता मात्र मला काय हवं आहे, हे मला चांगलं कळलंय. मला हत्तीसारखं बलाढ्य असं कोणीतरी हवं आहे,’’ ती म्हणाली.

‘‘पण हत्तींना गांधील माश्यांची भीती वाटते; कारण गांधील माश्या त्यांना चावतात. शिवाय, गांधील माशी इतकी लहान असते की हत्तीसुद्धा तिला मारू शकत नाही,’’ साधूमहाराज किंचित हसून म्हणाले.

हो का? ‘‘मग मला गांधील माशीच आवडेल,’’ ती मुलगी म्हणाली.

‘‘पण काही पक्षी गांधील माश्यांना भक्ष्य म्हणून खातात,’’ साधू महाराज म्हणाले.

‘‘मग पिताजी, मला पक्ष्यासारखंच कोणीतरी हवं,’’ ती म्हणाली.

‘‘अगं बाळे, पण मांजरं पक्ष्यांचा पाठलाग करतात, त्यांना पकडतात आणि खाऊन टाकतात,’’ साधूमहाराज एक दीर्घ सुस्कारा सोडत म्हणाले.

आता ती मुलगी हताश होऊन म्हणाली, ‘‘मग मला मांजरासारखंच कोणीतरी हवं! हे तर मी तुम्हाला कितीतरी आधीपासूनच सांगत होते ना?’’

आता परत एकदा साधू महाराज हसत म्हणाले, ‘‘बाळा, तू एक गोष्ट लक्षात ठेव. समजा उंदीर कुठेतरी लांब पळून गेले आणि भिंतीतल्या किंवा जमिनीतल्या बिळामध्ये लपून बसले, तर मांजरांना काही खायलाच मिळणार नाही, आणि बिचारी उपाशी मरून जातील.’’

‘‘ठीक आहे मग, तुम्ही माझ्यासाठी एखादा उंदीरच शोधा,’’

ती म्हणाली. आता आपण काय केलं पाहिजे, हे तिच्या लगेच लक्षात आलं. मग तिने साधूमहाराजांना तिचं स्वत:चं एखाद्या उंदरामध्ये रूपांतर करण्याची विनंती केली. साधू महाराजांनी आपल्या योगसामर्थ्याने तिला एक पिटुकला उंदीर बनवून टाकलं.


त्या उंदराने आपल्या वडिलांचे, म्हणजे त्या साधू महाराजांचे, आभार मानले आणि त्यांना म्हणाला, ''मला तुम्ही इतक्या प्रेमाने लहानाचं मोठं केलंत, त्याबद्दल मी तुमचा ऋणी आहे. मला एका मानवाच्या रूपात जगता आलं, त्या आयुष्याचा अनुभव घेता आला. मी आता इथून जाणारच आहे; पण जाण्यापूर्वी मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे. तुम्ही मला जेव्हा उंदरापासून एक छोटी मुलगी बनवलंत ना, तेव्हाच मला तुमच्या अंगच्या योगसामर्थ्याची कल्पना आली होती. मग तुमच्या अंगात जर एवढी शक्ती आहे, तर जेव्हा त्या चोरांनी तुम्हाला दोरखंडाने बांधून ठेवलं होतं, तेव्हा तुम्ही स्वत:च स्वत:चं उंदरात रूपांतर करून ते दोर स्वत:च कुरतडून का नाही टाकले? ते तर तुम्हाला सहज शक्य होतं!''

त्यावर साधू महाराज म्हणाले, ''बाळा, मी माझ्या योगसामर्थ्याचा वापर नेहमी इतरांना मदत करण्यासाठी करत असतो, माझ्या स्वत:साठी कधीच नाही.''

त्यावर तो उंदीर हसून पाठ फिरवून निघून गेला. तो बघता-बघता समोरच्या अरण्यात अदृश्य झाला. 'आपण जसे आहोत, त्यातच नेहमी समाधान मानलं पाहिजे,' हे त्याला आता कळलं होतं.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## हॅच्युकीसुनास्की

**आबा महाजन**

पृष्ठे : १४८
किंमत : ३९५

*कथा हॅच्यकीसुनास्कीची! एलियन वांगडू आणि पृथ्वीवरील मनुष्य यांच्यातल्या रोलरकोस्टरची!*

### मी... मिस्टर वांगडू

आकाशगंगेपासून पलीकडचं दूरवरचं ठिकाण. तिथे नुकतीच अंधारी रात्र सरली होती. निरव शांततेत पहाट हळूहळू उमलू लागली होती. सूर्याची तांबडी किरणं जमिनीवर रेंगाळू लागली. साधारण, आठ मिनिटांचा कालावधी संपला असेल, तोच जमीन दुभंगली आणि त्यामधून भलामोठा, अवाढव्य

राजवाडा हळूहळू वर येऊ लागला. संपूर्ण राजवाडा जमिनीवर स्थिरावला. पाच सेकंद झाले असतील तोच, दुभंगलेली जमीन झट्कन पूर्ववत झाली. मग, प्रचंड मोठा घंटानाद होऊ लागला. दाही दिशांना आवाज दुमदुमला. एका लयीतला सुमधुर, कर्णमधुर आवाज करतच, वाराही सुसाटला. फुलांची झाडं वाऱ्यावर सळसळू लागली. लहरू लागली. नाजूक रंगीबेरंगी फुलंही वाऱ्याच्या झोताबरोबर चक्क उडू लागली आणि उडतउडत वाड्याच्या चबुतऱ्यांवर जाऊन भिडली. मनमोहक राजवाडा फुलांच्या वर्षावाने न्हाऊन निघाला. मंदमंद सुगंध चोहीकडे पसरला. वातावरण गंधित झालं. राजवाड्याच्या समोर भलंमोठं प्रांगण. अगदी त्याच प्रांगणावर, आभाळात, ढगांनी ताबडतोब दाटी केली आणि पाहतापाहता हलकासा सुंगधी पावसाचा सडा पडला अन् माती गंधीत झाली. अतिशय विलोभनीय दृश्य होतं. पाऊस थांबतो तोच एक लांबलचक अवकाशयान गरगरत आभाळाकडे झेपावलं. वायुलहरींवर आरूढ झालं. उडतउडत, ढगांना चिरत भरधाव वेगानं अगदी दुप्पट-तिप्पट वेगात सुसाटलं. चारही दिशांना सूर्याची लाली पसरली होती. आभाळ तसं निरभ्र. वेग हळूहळू वाढू लागला. धोका कुठं दिसत नव्हता. आभाळ सामसूम होतं. ढगाच्या आणखी वरवर यान झेपावत होतं. इच्छित दिशेकडे मार्गक्रमण करत होतं.

अगदी मिनिटभर वेळ सरला असेल तोच, समोर पाहिलं तर अचानक धुराचे प्रचंड लोट निर्माण झालेले. अगदी काहीच सेकंदात प्रचंड काळसर धूर आणि धुकं अवतरलं. अचानक झालेल्या प्रकारानं यानचालकाची भंबेरी उडाली. तो चक्रावला. यानाची दिशा बदलण्यापूर्वीच यान धुराच्या लपेटमध्ये मिसळून गेलं. सगळीकडे काळाकुट्ट धूर. यानातले सगळेच बावरले. कारण, यान भरकटलं होतं. त्याला मार्ग सापडत नव्हता. तिथल्यातिथं ते चक्राकार फिरू लागलं. सगळेच धास्तावले. आता हा काळा धूर यानाला गडप केल्याशिवाय राहणार नाही, असं वाटू लागलं. असं वाटणं साहजिक होतं. कारण, या पूर्वी तशा घटना घडल्या होत्या. यानाने टुक...टुक... करत रेड लॅम्प वाजवायला सुरुवात केली होती.

धोक्याची घंटा. धोक्याचा इशारा. कन्ट्रोल रूमशी, तर पूर्णपणे संपर्क तुटला होता. यानातल्या स्क्रीनवर काहीच दिसत नव्हतं. दिसत होता तो फक्त आणि फक्त काळा धूर आणि खिडकीबाहेरचं दाट काळं धुकं. शत्रूनं परफेक्ट डाव साधला होता.

आता आपला मृत्यू अगदी जवळ येऊन ठेपला आहे, अशी सगळ्यांच्या मनानं धास्ती घेतली. यानाचा वेग आपोआप एकदम मंदावला. यानाचं तिथल्यातिथं घिरट्या घालणं सुरूच होतं. ते धुराच्या बाहेर निघू शकत नव्हतं. जणूकाही जाळ्यात अडकलं होतं. काळ्या धुराचे लोट आणखीन वाढू लागले. भयंकर तांडव सुरू झालं. चक्राकार फिरू लागलं. धुराची चक्री तयार झाली आणि मग जे व्हायचं होतं तेच झालं. त्या धुरामधून बघताबघता शंभरफुटी आकृती तयार झाली आणि त्यामधून प्रचंड राक्षसी आवाज येऊ लागला. भेसूर आवाज. अत्यंत भयावह आवाज. आश्चर्यजनक आवाज. डरकाळी फोडणारा आवाज. इतका भयंकर, इतका भयंकर की, या आवाजानं अवकाशयानदेखील डगमगू लागलं, थरथरू लागलं. आता यातून सुटका अशक्य होती. कन्ट्रोल रूमच्या संपर्कासाठी आटोकाट प्रयत्न सुरूच होते. कारण, आता तेवढंच हातात होतं; पण सगळंच व्यर्थ जात-जात पदरी निराशाच आली. परंतु, तितक्यात यानातल्या स्क्रीनवर अस्पष्टसा सिग्नल चमकू लागला. तुटकतुटक संपर्क होऊ पाहत होता. चिकाटीचे प्रयत्न सुरूच होतेच आणि पाहतापाहता अखेर ग्रीन सिग्नल सुरू झाला. शुभ संकेत होता त्यामुळे त्यांचा विश्वास पुन्हा वधारला, दुणावला. होप्स वाढले अन् अखेरीस कन्ट्रोल रूमशी पुन्हा संपर्क जुळला.

खिडकीच्या बाहेर नजर टाकली, तर वाऱ्याच्या वेगानं चंदेरी रंगाचं एक अवकाशयान मदतीला धावून आलं. यानानं धुराच्या अवतीभवती गर्रकन चक्कर टाकून परिस्थितीचा अंदाज घेतला आणि थेट हल्ला चढवला. एक घाव काळ्या धुरावर आणि एक जमवून आणलेल्या मेघांवर. आकृतीचा आवाज आता आपसूक क्षीण होत-होत मंदावला. आकृती बिथरली. तशी प्रचंड आवाज करत वीज कडाडली. मेघ गरजले

आणि मिनिटभराच्या आत पावसाने धुमाकूळ सुरू केला. त्यामुळे झालं काय की, काळा धूर गायब, धुकं गायब. धुराची आकृती गायब अन् सर्वांचा जीव भांड्यात पडला. धोका पूर्णपणे टळला. हे पाहून चंदेरी यानाने पुन्हा एक गिरकी घेतली आणि ते पूर्वेकडे सप्कन निघून गेले. मग यानाची सुरळीत सफर सुरू झाली. माझे टकल्यावरचे तुर्रेदार डोळे आनंदानं चमकून उठले. आनंदाची लहर पसरली. यानातले सगळे खूश... अगदी मीसुद्धा.

आता तुम्ही म्हणाल की, मी म्हणजे कोण? तर सांगतो...

मी... मी... मिस्टर वांगडू. माझं संपूर्ण नाव 'धुमशुक कुमुशाक वांगडू.'

परग्रहावरचा रहिवासी.

आमच्या ग्रहाचं नाव 'हॅच्युकीसुनास्की.'

माझं वय दोनशे वर्षं, दोन महिने, दोन दिवस.

उंची कधी एक इंच; तर कधी शंभर फूट.

ऐकून असं दचकलात का?

खरंच...

नॉर्मल उंची तशी चार फूट. मी कुमार वयाचा आहे.

रंग कधी गोरा. कधी कुट्ट काळा.

तर कधी निळा. जांभळा. पांढरा. हिरवा. कसाही...

म्हणजे, जशी परिस्थिती तसा रंग बदलतो मी.

नॉर्मल रंग म्हणाल, तर चंदेरी.

मला दोन हात आहेत. माणसांसारखे.

कधीकधी मी त्या दोन हातांचे चार हातसुद्धा करू शकतो.

म्हणजे असं की, खांद्यापासून आणखी जास्तीचे दोन हात मी क्षणार्धात उगवू शकतो.

मला पाय दोन.

दोन्ही पायांनी मी सुलटा चालतो.

तर, कधीकधी उलटाही चालू शकतो. मला वेगवेगळ्या ग्रहांवर

भटकंती करायला आवडतं. संशोधन करायला आवडतं. नेहमी नव्या गोष्टी शिकण्याविषयी कुतूहल असतं.

असंय हे.

एकदा ना गंमत घडली.

नेहमीचीच टूर होती. संशोधनासाठीची. आम्ही पृथ्वी ग्रहाचे प्रशंसक असल्यामुळे ठरल्याप्रमाणे पृथ्वीवर आलो होतो. तिथलं चमकणारं निळसर पाणी आणि पांढऱ्या फेसासारख्या ढगाखालचा निळसर समुद्र आम्हाला आवडतो. तिथलं जंगल आवडतं आणि मनुष्यजीवनही आवडतं, चालीरीती आवडतात, संस्कृती आवडते. इथल्या अनेक गोष्टींचं आम्हाला कुतूहल आहे.

तर, वेळ रात्रीची.

आमचं यान एकाकी बंद. मोठी पंचाईतच.

मी यानातून खाली उतरलो.

तर समोर एक माणूस.

जरा विचित्र दिसत होता.

माझ्याकडे पाहून त्यानं जबडा मोठा केला.

ही ह्यहु ही ह्य हु... ही ह्यहु ही ह्य हु...

असला आवाज काढत हसू लागला. त्याचे डोळे मांजरीसारखे. अंधारात आणखी चमकत होते.

मी स्तब्ध.

तो माझ्याकडे पाहून चक्रावला.

कसाबसा भयभीत होऊन म्हणाला,

''कोण रे तू?''

''मी... मी... मिस्टर वांगडू. वय दोनशे वर्षं, दोन महिने, वीस दिवस.''

''येडा समजतो का? एवढं कुठं वय असतं का?''

''आमच्यात असतं.''

''हँ???''

‘‘हे तर काहीच नाही, माझ्या बापाचं, तर चारशे वर्षं, चार महिने, चार दिवस इतकं वय.’

‘‘एवढं तुझं वय.. मग तू सातवी-आठवीतल्या पोराएवढाच कसा?’’

‘‘कारण, मी आहे परग्रहावरचा माणूस.’’

‘‘माणूस?’’

‘‘म्हणजे... एलियन!’’

‘‘मी थोडाथोडा माणसांसारखा दिसतो, बोलतो. म्हणून, मला काही जण माणूस म्हणतात. तर काही एलियन!’’

‘‘अजबच आहे हे!’’

‘‘तू कोण आहेस?’’

तर तो म्हणाला, ‘‘मी भूत.’’

भुताच्या गोष्टी मीसुद्धा ऐकल्या होत्या. त्याप्रमाणे त्याचे पायही तसेच होते.  उलटेउलटे. केस मोठे. हाता-पायाचा सांगाडा.

त्याला वाटलं मी घाबरेन.

पण, छे! मी कसला घाबरतोय?

भुताची थोडी खेचावी, गंमत करावी असं वाटलं मला.

अन् मग, मी एका क्षणात माझा चंदेरी रंग बदलला आणि काळाकुट्ट झालो. इतका काळा-इतका काळा की, अंधारापेक्षाही काळपट.

त्याच्यासमोर उभा राहूनसुद्धा मी त्याला दिसत नव्हतो.

बिच्चारं भूत.

करू लागलं शोधाशोध.

डोळे गरागरा फिरवू लागलं. शोधून हैराण. परेशान.

मी म्हणालो, ‘‘अरे भुतू, मी तर तुझ्यासमोरच उभा आहे ना!’’

तो म्हणाला, ‘‘कुठं?’’

असं म्हणत तो चौफेर नजर फिरवू लागला. आवाज कुठून येतोय ते कळेना त्यामुळे त्याची गोची झाली होती.

मग मी प्रकटलो त्याच्यासमोर. अगदी जवळ आणि हळूहळू माझं

शरीर लाल रंगाचं होऊ लागलं. नंतर मग जांभळा रंग.

त्याच्या तीक्ष्ण डोळ्यांना माझा बदललेला रंग दिसत होता.

अंधार आहे, म्हणून काय झालं!

शेवटी भूतच ना ते. त्याला सगळं समजत होतं की, हा एलियन म्हणजे भुताचासुद्धा बाप दिसतोय. नुसता बापच नाही, तर खापरपणजोबा आहे.

'हा भयानक प्रकार आहे. इथं थांबण्यात काही अर्थ नाही.' असं तो पुटपुटला. त्या भुताला दरदरून घाम फुटला. त्याची बोबडी वळली आणि त्या भुताने उलट्या पायांनी धूम ठोकली. हुं... आणि हो... एकदातर काय झालं? हो... हो... सगळं सविस्तर सांगतो.

तर, गेल्याच्यागेल्या उन्हाळी सुट्टीत आम्ही मुंबईला आलो होतो. आई-बाबाही सोबत होते. फॅमिली टूरच जणू.

आम्ही अदृश्यपणे फिरत होतो. फिरताफिरता आलो चौपाटीवर.

फेसाळलेला समुद्र. त्या सागरी लाटा. किनारा.

अथांग पाणी.

व्वा! भारीच!

समुद्राचा सुंदर नजारा. मी झालो प्रकट. कारण, अदृश्यपणे समुद्र पाहण्यात कसली आलीये मजा?

म्हणून झालो प्रकट. भलामोठा अथांग समुद्र आणि दूरवर दिसत असलेलं एक छोटूसं जहाज. छान दृश्य होतं ते.

त्या जहाजावर बसावं असं मला वाटलं.

पण, पाहतो तर काय? ते तर दूरदूर जाऊ लागलं.

आणखी-आणखी दूर जाऊ लागलं.

मी अधीर झालो.

मग, मी चक्क धावत सुटलो जहाजाकडे.

तर मला धावतांना पाहून चौपाटीवरचे काही लोकं धडाधड बेशुद्धच.

तेव्हा बाबांनी मला खूप झापलं,

म्हणाले, ''तुझ्यामुळे ते लोक बेशुद्ध पडले. वांगडू, अरे तुला काही अक्कलबिक्कल आहे की नाही?

डोक्यातली चीप बरोबर बसवलीय ना तू?''

मी गुमान उभा.

''असा कसा वागू शकतोस तू? अँ?

हे काय आपलं 'हॅच्युकीसुनास्की' समजतोयंस का तू?

असली जादू दुसरीकडे करायची नाही.

कितीदा बजावलंय तुला मी, बजावलंय ना?''

मी मान हलवली. ''हं...''

''तरी तू विसरतो. हे नेहमीचं झालं आहे तुझं. हे वागणं बरं नाही. लक्षात ठेव.''

मी म्हणालो, ''मी काय केलंय बाबा, फक्त जहाजावर बसण्यासाठी धावलोय ना. त्यात काय एवढं?''

''अरे वेड्या, धावलाबिवलास ते सगळं ठीके! पण, डायरेक्ट समुद्राच्या पाण्यावरून धावण्याची काय गरज होती?

लोकांना वाटलं काहीतरी भुताटकी आहे. म्हणून, पडले ना ते बेशुद्ध.''


मग, कुठं सगळा प्रकार माझ्या ध्यानी आला.

''असंय होय!''

''कधीकधी ना अतिउत्साहाच्या भरात मी असलं काहीतरी अचाट करून बसतो आणि नंतर मात्र बाबांची रागारागी पचवावी लागते.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# टाटूमुटूचा चंद्र

**फारुक एस.काझी**

पृष्ठे : ७६
किंमत : २५०

*आजच्या काल्पनिक; परंतु उद्याच्या वास्तविक होऊ पाहणाऱ्या बालविश्वातील रंजक कथा...*

### एसपी१३

''हॅलो.. हॅलो मामा... मी समाय...''

''हॅलो... हॅलो... समायरा तू कुठे आहेस? आणि तुझा आवाज असा का येतोय?''

''मा..मा.., खूप मोठ्ठा- डेंजर प्रॉब्लेम झालाय.''

''काय झालंय? मला स्पष्ट सांग.'' मामाचा आवाज अधीर आणि कापरा झाला.

‘‘मा..मा.. मी इकडे अंतराळात आलीये.’’

हे ऐकताच मामाचे डोळे विस्फारले. त्याचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना.

‘‘स..स..स्पे..स...तिथे तू काय करतीयेस?’’ मामाचा आवाज अजूनच कापरा झाला.

‘‘मामा मी...तुमचं...’’ मध्येच आवाज कट झाला आणि मामाच्या डोक्याला मुंग्याच आल्या.

पोरगी स्पेसशीप घेऊन गेलीये? आणि तीही एकटी?

पलीकडून आवाज येत नव्हता आणि मामाच्या पायाखालची जमीन सरकली होती.

त्यानं संपर्क करण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ. तो हतबल झाला. खुर्चीत कोसळला. त्याचा सहकारी ख्रिस, धावतच तिथे आला आणि त्यानं त्याला धरून आतल्या सोफ्यावर नेऊन झोपवलं.

‘‘मामा..मामा...’’ समायरा पुन:पुन्हा संपर्क करण्याचा प्रयत्न करत होती; परंतु कनेक्शन मिळत नव्हतं. समायरा खूप घाबरली होती. आपण खूप मोठी चूक केलीये हे तिच्या लक्षात आलं होतं; पण आता वेळ निघून गेली होती. आता परतणं अशक्य होतं.

मामाकडून ती जे काही शिकली होती त्याचा वापर करण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतं. तिने कंबर कसली. मामानं एक हॅन्डबुक तयार केलं होतं. तिला ते सापडेना. तिला ते हवं होतं कारण, शीपची दिशा आणि इंधन यांचा तिला अंदाज नव्हता.

तिची चूक तिला भोवली होती. मामा नसताना

स्पेसशीपमध्ये जाण्याची आणि नको तिथे लुडबूड करण्याची चूक तिनं केली होती. ख्रिस अंकलपण चिडणार. जाऊ दे, म्हणत तिनं डोक्यातले सगळे विचार बाजूला सारले आणि शीपची कमान सांभाळली.

स्पेसशीप चालवण्याचं स्वप्नही तिनं कधी पाहिलं नव्हतं; पण आता ती स्वप्नात नव्हती, तर एक भयंकर सत्य तिच्यासमोर खरंखुरं उभं ठाकलं होतं.

''What happened, Macky?'' ख्रिस मामाला विचारत होता; पण मामाला बसलेला धक्का इतका भयंकर होता की, तो काहीच बोलू शकत नव्हता.

''Say something.'' ख्रिस काळजीच्या स्वरात बोलला.

''Look, Macky, please say something. I am so scared.'' ख्रिस प्रचंड काळजीत होता. मामा मलूल स्वरात बोलू लागला,

''Khris, sam'' मामाला हुंदका दाटून आला. मामाने सर्व हकिकत ख्रिसला सांगितली आणि तो डोळे मिटून पडून राहिला.

ख्रिसला आता खरोखर भीती वाटू लागली होती. त्याने पटापट फोन करून काही सूचना दिल्या.

काहीही करून त्या स्पेसशीपचा शोध घेणं गरजेचं होतं, नाहीतर अनर्थ होणार होता.

फोनवर सूचना देतदेतच तो गाडीकडे धावला. शक्य तितक्या लवकर स्पेस रिसर्च सेन्टर गाठावं लागणार होतं.

आपण कुठे जातोय याची पुसटशीही कल्पना समायराला

नव्हती. स्क्रीनवर जो नकाशा दिसत होता तो कुठला आहे आणि कशाचा आहे हेही तिला कळत नव्हतं.

अशा वेळी मामाने दिलेल्या काही सूचना तिला आठवत होत्या. ती धडपडत होती; पण असं अंतराळात फिरणं धोक्याचं होतं. कधी काय येऊन धडकेल याची अजिबात शाश्वती नव्हती; कारण अंतराळात अनेक लघुग्रह, धुमकेतू फिरत असतात.

ती अजून सावध झाली. मामाबरोबर अंतराळ सफरीचे लॅबमध्ये केलेले डेमो आठवत तिनं वाटचाल सुरू केली.

''सगळे प्रयास थकले. समायरा सापडली नाही.'' असं म्हणून मामाने मोबाइल बंद केला. पलीकडे समायराच्या आईला हुंदका फुटला होता.

मामा स्वत:ला दोष देत होता. तिला आपण असं लॅबमध्ये एकटं सोडायला नको होतं; पण त्याचाही नाइलाज होता. त्याला व ख्रिसला रिसर्च सेन्टरला तत्काळ बोलावलं गेलं होतं. समायरा लॅबमध्ये एकटीच होती आणि तिच्या हातून ते छोटं स्पेसशीप सुरू झालं होतं. ते अंतराळात जायला जवळजवळ तयार होतं. अजून काही काम बाकी होतं; पण नेमकं असं काय घडलं की, शीपची दिशाच बदलली? त्याचा माग कुठेच लागत नाहीये?

मामा खचून गेला होता. आता समायरा कधीच परत येणार नव्हती. ''हॅलो, ०१३२१.. हॅलो...''

मामा संपर्क करण्याचा प्रयत्न करत होता; पण कसलाच संपर्क होत नव्हता. प्रयत्न करूनही त्यांना आपली दिशा आणि मार्ग सापडत नव्हता.

तब्बल सात वर्षांच्या मेहनतीचं फळ होतं की, मामा आणि ख्रिसच्या टीमनं मंगळावर जाणाऱ्या स्पेसशीपचं संशोधन पूर्ण करून अवकाशात झेप घेतली होती; पण मंगळाकडे धाव घेत असतानाच असं काही घडलं की, शीपची दिशाच बदलली आणि शीप भलत्याच दिशेने निघालं. प्रयत्न करूनही त्यांना मूळ दिशा घेता येईना.

''Khris? What's now?''

दोघांत चर्चा झाली आणि त्यांनी सुरू असलेला प्रवास असाच पुढे नेण्याचा निर्णय घेतला. ख्रिस नोंदी ठेवत होता; कारण हा प्रदेशच वेगळा होता.

मामा शीप पुढे घेऊन जात होता आणि अचानक नजरेला काहीतरी पडलं!

''तुम्ही इथे का आलाय? खरं बोला, अन्यथा आम्ही सत्य बाहेर काढू शकतो.''

असा आवाज येताच मामाने चमकून पाहिलं. एका विशाल पठारावर त्यांचं स्पेसशीप उतरवलं होतं आणि एक जरब असलेला आवाज त्यांना प्रश्न विचारत होता.

''आमचा काहीही हेतू नाही. आम्ही मंगळाकडे जात होतो. अचानक आमच्या शीपची दिशा बदलली. ग्रॅव्हिटी लेवल इतकी प्रचंड होती की, आम्ही आमची मूळ दिशा घेऊच शकलो नाही.''

''तुमच्यावर विश्वास नाही. तुम्ही मानव आहात आणि आमच्या ग्रहाला नष्ट कराल. तेव्हा काही दिवस तुमची तपासणी होईल आणि मगच तुम्हाला इथे प्रवेश मिळेल.''

असं म्हणताच काही सैनिक तिथे आले. त्यांनी त्या दोघांना

छोट्या स्पेसशीपमध्ये बसवलं आणि ग्रहापासून दूर असलेल्या एका पठारवजा जागेवर उभ्या असलेल्या भव्य इमारतीत नेलं.

ती इमारत म्हणजे एक मोठी प्रयोगशाळाच होती.

तिथल्या एका खोलीत दोघांना ठेवलं गेलं. तिथे सर्व सुविधा होत्या आणि बंदिस्त काचेच्या दोन पेट्या होत्या.

त्यात मामा आणि ख्रिसला ठेवलं गेलं. मामाला जाणवलं की, कसलंतरी द्रव्य त्यांच्या शरीरभर पसरत चाललंय. ते काय आहे हे समजलं नाही; पण मेंदू पूर्णपणे शांत होतोय आणि आपण खूप हलके होतोय असं जाणवायला लागलं.

तब्बल चार वेळा त्यांना या प्रक्रियेतून जावं लागलं. पाचव्या दिवशी त्यांना एका मोठ्या हॉलमध्ये बोलावण्यात आलं.

इथले लोक ना मानवांसारखे अजिबात नव्हते. अगदी वेगळे. मानवी शरीर असतं, तसंचल; पण लालसर डोळे आणि गेंड्याची कातडी असते तशी कातडी. केस नव्हते.

आहार पातळ पदार्थ; पण भाजीपाला आणि इतर गोष्टी यांनी शोधल्या कशा? आणि श्वास? हे श्वास म्हणून कोणता वायू वापरत असावेत?

मामाला अनेक प्रश्न पडले होते.

त्यांना ठेवलेल्या हॉलमध्ये अनेक सदस्य बसलेले होते आणि एक मुख्य वयस्कर व्यक्ती मधोमध थोड्या उंचीवर बसली होती.

तुमची सत्यता पटली. तुम्ही आता तुमच्या मार्गाने जाऊ शकता.

असा आदेश मिळताच मामा आणि ख्रिस रूमकडे जायला वळले. ''मामा, शेवटची विनंती करायला आलीये.''

बॅग भरता भरता मामाने दचकून मागे पाहिले. मागे समायरा उभी होती.

‘‘समा...’’

‘‘हो मामा, मीच आहे.’’

मामा आणि ख्रिस प्रचंड खूश झाले.

‘‘मामा, तुम्हाला तुमचा मार्ग आणि दिशा दोन्ही दाखवली जाईल. फक्त एक विनंती करायला आलीये.’’

‘‘कसली? आणि तू आमच्यासोबत येणार नाहीस का?’’

‘‘नाही. माझं म्हणणं नीट ऐका. ते जास्त महत्त्वाचं आहे.’’

‘‘तुम्ही इथून जेव्हा पृथ्वीकडे जाल, तेव्हा चुकूनही या ग्रहाचा उल्लेख करू नका. हा ग्रह खूप शांत आणि संपन्न आहे. इथे मानवी पाऊल पडलं, तर या ग्रहाला धोका निर्माण होईल. तेव्हा माझी कळकळीची विनंती आहे की, तुम्ही इथून गेल्यावर या ग्रहाचा उल्लेख कुठेही करू नका.’’

‘‘हम्म..’’

‘‘तुम्ही पाहिलं असेल हा ग्रह आणि इथले लोक अत्यंत हुशार आणि चिकित्सक आहेत; पण त्यांनी इथल्या निसर्गाशी आपली नाळ जोडून ठेवली आहे. ते संगीत जाणतात आणि भाषासुद्धा. निसर्गाकडे सर्व प्रश्नांची उत्तरं असतात आणि त्याचाच वापर करून यांनी काही डिव्हाइस बनवले आहेत. तुम्हाला ज्या पेट्यांमध्ये ठेवलं गेलं होतं, तिथे तुमच्या मनातील सर्व विचार आणि तुमची भाषा एका डिव्हाइसमध्ये रेकॉर्ड केली होती. म्हणून ते तुमची भाषा बोलू शकले. तेव्हाच मला तुमच्याविषयी कळलं. मला तुम्हाला भेटायची परवानगी मिळाली. म्हणून मी इथे येऊ शकले.’’

''तू इथे कशी आलीस आणि इथल्या लोकांनी तुला स्वीकारलं कसं काय?''

मामाने उत्सुकतेनं विचारलं.

समायराने सर्व हकिकत सांगितली.

''मी इथे आले तेव्हा माझीही परीक्षा झाली. मी लहान होते. हे लोक लहान मुलांना निसर्गाचं वरदान मानतात. त्यांच्या प्रेमळ वागणुकीने मीही निसर्गात हरवून गेले. किती अजब विश्व आहे निसर्गाचं. आपल्याला हे कळलं नाही, मामा. विकास म्हणजे निसर्गाला ओरबाडणं नव्हे, तर निसर्गासोबत जाणं. त्याच्या हातात हात देणं. म्हणून, मी इथेच राहायचा निर्णय घेतलाय. मीही निसर्गाच्या रहस्यांना उलगडत राहीन. नोंदी ठेवेन. इथल्या पुढच्या पिढ्या त्यात भर घालत राहतील.'' ती जायला निघाली.

''मामा, आईला काहीही सांगू नकोस.''

ख्रिस प्रचंड हैराण होता... परेशान झाला होता. हे लोक, इथलं तंत्रज्ञान आणि समायराचा निर्णय.

मामाही क्षणभर स्तब्ध झाला आणि शेवटी हसला.

त्याने आपली डायरी बाहेर काढली आणि त्यात लिहिलं- SP१३ ''What's this?'' ख्रिसने गोंधळून विचारलं.

''The name of this planet. But only for us.''


''SP१३ means?''

''Samayara's Planet, Which she found at the age of १३. It's SP१३.''

आणि दोघांच्याही चेहऱ्यावर एकदम हसू फुललं.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## हत्ती गट्टी गंमत गोष्टी

**हिमानी परांजपे**

पृष्ठे : ७२
किंमत : २९५

*मस्तीखोर इंदूची जागरूक आई...*
*शिकवण देई माणसापरी*

### धुक्याचा धबधबा

धुक्याच्या धबधब्याचं नाव ऐकताच इंदूचे कान टवकारले. तिच्या डोळ्यांत वेगळीच चमक आली आणि तिच्या चेहऱ्यावर प्रचंड उत्साह दिसू लागला.

तिनं धुक्याच्या धबधब्याची खूप वर्णनं ऐकली होती. कसा तो धबधबा हज्जार हत्तींना

एकावर एक ठेवलं तरी त्याहीपेक्षा खूप उंच आहे. त्याच्याकडे बघितलं की असं वाटतं- कोणीतरी आकाशातून दुधाचा वर्षाव करतंय. तरीही तो इतका रंगबेरंगी दिसतो आहे की, जणूकाही सूर्यबाप्पानेच त्याच्यावर भरपूर इंद्रधनुष्ये रंगविली आहेत.

''ए आई, मलापण जाऊ दे ना गं सगळ्यांसोबत धबधबा बघायला!'' इंदूनं इरावतीला विचारायला सुरुवात केली.

''इंदू बाळा, असं एकट्यानं धबधबा बघायला जाण्यासाठी तू अजून खूप लहान आहेस.'' इरावतीनं इंदूला समजावून सांगितलं.

''अगं, मी एकटी कुठं आहे. सगळ्यांच्या सोबतच जात आहे ना?'' इंदूनं इरावतीकडे हट्टच धरला.

इरावतीला जंगलातील सर्व धोक्यांची पूर्ण कल्पना होती. म्हणून, ती कधीही छोट्या मुलांना कळपापासून दूर जाऊ देत नसे. इतक्या छोट्या मुलांना कुठंही न्यायचं म्हणजे किती जबाबदारीचं काम आहे याची तिला पूर्ण जाणीव होती.

''या वेळेस मी नाही सोडणार तुला इंदू. पुढच्या वेळेस मी स्वतः तुला आणि तुझ्या सर्व छोट्या दोस्तांना घेऊन जाईन.'' इरावतीनं इंदूला जरा दटावूनच सांगितलं.

इंदूला जायची खूपच इच्छा होती; पण आईसमोर काहीही चालणार नाही, हे तिच्या लक्षात आलं.

''पुढच्या वेळेस नक्की ना आई?'' इंदूनं पुन्हा एकदा खात्री करून घेतली.

इरावतीनं इंदूच्या डोक्यावरून सोंड फिरवली आणि इंदूला आश्वासन देत शांत केलं.

पुढे बरेच दिवस सगळी मोठी मंडळी फक्त धुक्याच्या

धबधब्याच्याच गोष्टी करत होती. कशी तिकडे त्यांनी धम्माल केली, कसं बेभान होऊन पाण्यात डुंबायला मिळालं आणि... असं बरंचकाही. या सगळ्या गोष्टी ऐकताना, प्रत्येक वेळी इंदूचा चेहरा पडायचा हे इरावतीला दिसत होतं. पण, इरावती अशा एका चांगल्या दिवसाची वाट बघत होती, जेव्हा सगळ्या चिमुकल्यांना ती धबधब्यावर नेऊ शकेल.

आणि... अखेरीस तो दिवस आलाच. आकाश स्वच्छ निळं होतं. ऊनपण बेताचं होतं. हे बघून इरावतीनं इंदूला हाक मारली.

''इंदू बाळा, आज जायचं का धुक्याचा धबधबा बघायला?'' इरावतीनं विचारलं. हे शब्द ऐकताच इंदूचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिला काय करू आणि काय नको असं झालं.

''हो आई, आता लगेच जायचंय ना?'' इंदूनं खात्री करून घेतली.

इरावतीनं मान डोलावताच, इंदू तिच्या सवंगड्यांना सांगायला सुसाट पळत सुटली.

''टूटूटूट तूउऊट'' छोट्या हत्तींची सर्व सेना आनंदानं चित्कारू लागली. कारण, सगळे जण याच दिवसाची खूप आतुरतेनं वाट बघत होते.

सगळी पलटण धबधब्याकडे जात असताना, लहान हत्तींचं आजूबाजूला बारीक निरीक्षण सुरू होतं. त्यांच्या घरापेक्षा इकडचं जंगल वेगळं होतं.

जास्त हिरवं आणि घनदाट होतं. उंच उंच वृक्ष आकाशाला मिठी मारत होते, तर जमीन हिरव्या लुसलुशीत गवताच्या

गालिच्यांनी भरलेली होती. सगळीकडे छोटे छोटे झरे वाहत होते आणि अवतीभोवती बरेच बेडूकराव डरावडराव करत होते. ही सगळी गंमत बघतबघत आपले छोटे हत्ती लुटुलुटू एकामागून एक चालत होते.

जसजशी ही रांग पुढे जात होती तसतसा पाण्याचा आवाज वाढायला लागला. ओल्या मातीचा सुगंध इंदूनं भरभरून घेतला आणि एक मोठ्ठा उसासा टाकला.

आणखी काही वळणांनंतर ही हत्तींची झुकझुकगाडी मोठ्या बांबूच्या कमानीखालून गेली. ते भलेमोठे बांबू बघून सगळ्यांना खूप आश्चर्य वाटलं; पण धबधब्याची हुरहूर लागली होती म्हणून सगळे पटापट चालत राहिले.

जशी बांबूची कमान संपली, तसं धबधब्याचं विशालकाय असं दृश्य सर्वांसमोर उभं ठाकलं.

''अबबबबब! किती प्रचंड आहे हा धबधबा! कुठे संपतो आहे हे कळतच नाहीये!'' इंदू उद्गारली.

सगळे छोटे हत्ती जे पहिल्यांदाच धबधबा बघत होते ते थक्क होऊन बघतच राहिले. इरावतीला तिनं पहिल्यांदा जेव्हा धबधबा बघितला होता त्याची आठवण झाली. तीसुद्धा हा महाकाय धबधबा बघून भारावून गेली होती.

डोंगराच्या रुंद अशा पाठीवरून वेगानं पाणी खाली कोसळत होतं.

सूर्याचे किरण पाण्यासोबत झटापटीचा खेळ खेळत होते.

कापसासारखे ढग पाण्याभोवती फेर धरून नाचत होते.

हवेची झुळूक लाडानं धबधब्याला जणू गुदगुल्या करत होती.

पाण्याचं धुकं बनून हवेत पसरत होतं.

पूर्ण वातावरण धुक्यानं मंत्रमुग्ध झालं होतं.

''आई, हा धुक्याचा धबधबा गजनायकासारखा प्रचंड विशाल आणि सुंदर आहे गं... पण आई, इंद्रधनुष्ये कुठे आहेत?'' इंदूनं उत्सुकतेनं विचारलं.

इरावती काहीही न बोलता शांतपणे खालच्या तलावात उतरली आणि इंदूकडे बघून मिश्कीलपणे हसली.


पटकन आपल्या सोंडेत पाणी घेऊन इरावतीनं इंदूवर पाणी फवारलं. ''आता बघ कशी जादू होते ते...'' इंदूला आईच्या या खेळकरपणाची मज्जा वाटली. तिनं लगेच आपल्या छोट्याशा सोंडेत पाणी भरलं आणि आईवर उडवलं आणि काय आश्चर्य, सूर्यानं त्या फवाऱ्याला वेचलं. आपले सूर्यकिरण त्यात मिसळले आणि इंदूला रंगीबेरंगी इंद्रधनुष्य तयार करून दिलं. इंदू आश्चर्यचकित होऊन बघतच राहिली. पुन्हा एकदा पाणी भरून उडवलं, तर दुसरं इंदधनुष्य निर्माण झालं. आपण साध्या फवाऱ्यातून इतक्या पटकन इंद्रधनुष्य तयार करू शकतो यावर इंदूचा विश्वासच बसेना.

इंदूची ही करामत बघून, तिच्या छोट्या मित्रांनीपण एकमेकांवर फवारे उडवायला सुरुवात केली आणि पाहतापाहता पूर्ण आसमंत इंद्रधनुष्यांनी भरून गेला. इंदूनं आजूबाजूला बघितलं आणि हे सगळं आपल्या मनात साठवून ठेवलं.


आईच्या कुशीत येऊन ती म्हणाली, ''आई, हा क्षण मी कधीच विसरणार नाही. मला इथं आणलंस त्याबद्दल थँक यू आई!''

◆

## खाली दिलेले चित्र चौकोनात काढा.



## पुस्तकाच्या पानांतून




# हरवलेल्या कर्णफुलांचे रहस्य

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**

पृष्ठे : १४४

किंमत : २२०

*रोमांचक कथेतून इतिहासाचे कंगोरे उलगडत जाणारी लहानग्यांसाठीची विलक्षण कहाणी*

### सुट्टीचे बेत

जानेवारी महिन्याची अखेर आली होती. बंगलोरमधल्या हिवाळ्याचा तो शेवटचा टप्पा होता. या शहराला एकेकाळी पेन्शनर्स पॅराडाईज किंवा निवृत्त लोकांचं नंदनवन, असं संबोधण्यात येत असे, पण अलीकडे मात्र ते नाव हळूहळू लोप पावत चाललं होतं. आजकाल या शहराला

भारताची सिलिकॉन व्हॅली म्हणूनच ओळखण्यात येत असे. टेक्नॉलॉजी आणि ट्रॅफिक जॅम या दोन गोष्टींसाठी आता या शहराची ख्याती होती.

त्या दिवशी सकाळी अनुष्काचा आनंद गगनात मावत नव्हता. याची दोन कारणं होती. पहिलं म्हणजे १० फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी असे दहा दिवस तिच्या शाळेला सुट्टी असणार होती. त्याचं कारण असं, की त्यांच्या शाळेमध्ये अखिल भारतीय शिक्षक मेळावा भरणार होता. त्याचं यजमानपद त्यांच्या शाळेकडेच होतं. शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्व पालकांना तशा अर्थाचं पत्र सुद्धा पाठवलेलं होतं. ही सुट्टी कशासाठी देण्यात येत आहे हे त्यांनी त्या पत्रात स्पष्ट करून सांगितलं होतं. त्याचबरोबर पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला ही सुट्टी भरून काढण्यासाठी शाळा दहा दिवस लवकर सुरू करण्यात येईल असंही त्यांनी पत्रात नमूद केलं होतं.

अनुष्काच्या आनंदाचं आणखी एक कारण होतं, ते म्हणजे तिचं नृत्य. गेल्या काही वर्षांपासून ती कुचीपुडी नृत्याचे धडे घेत होती आणि लवकरच लंडनमध्ये साजऱ्या होणाऱ्या वसंतोत्सवात भाग घेण्यासाठी त्यांच्या नृत्याच्या संघाची निवड झाली होती. वसंत ऋतूच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी हा महोत्सव भरवण्यात येणार होता. लंडनमध्ये असलेल्या 'भारतीय विद्या भवन' या सांस्कृतिक संस्थेने या महत्त्वाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी घेतली होती. त्यामुळे त्यांचा संघ एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचं दर्शन घडवण्यासाठी लंडनला जाणार होता.

ही आनंदाची बातमी आपल्या आजी-आजोबांना कळवण्यासाठी अनुष्काने मोठ्या उत्साहाने त्यांना फोन लावला. गेल्या काही दिवसांपासून अनुष्का आणि तिचे आजी-आजोबा यांच्यातलं प्रेम

जास्तच घट्ट झालं होतं. पलीकडून आजीने फोन उचलला.

''अगं अनुष्का, मी तुला आत्ता फोन करणारच होते. मला तुला एक छानशी बातमी द्यायची आहे,'' आजी म्हणाली. ''आम्ही उत्तर भारताच्या प्रवासाला जायचं ठरवलं आहे. गेल्या काही दिवसांपासूनच आमच्या मनात तिकडे जाण्याचा विचार चालू होता. आणि हो, या उन्हाळ्यामध्ये आम्ही राधाला भेटायला लंडनलासुद्धा जायचं ठरवलं आहे, बरं का. राधा बऱ्याच वर्षांपासून आम्हाला दोघांना तिकडे येण्याचा आग्रह करत आहे.'' राधा ही आजीची एकुलती एक भाची. ती गेल्या २५ वर्षांपासून लंडनमध्ये स्थायिक झालेली होती.

ते ऐकून अनुष्काने आनंदाने उडीच मारली. ''अरे वा, काय योगायोग म्हणायचा! आम्हाला अचानक दहा दिवसांची सुट्टी मिळाली आहे. तुमच्या या उत्तर भारताच्या ट्रिपला मीसुद्धा तुमच्याबरोबर येईन. नाहीतरी मलासुद्धा दिल्ली बघायचीच आहे.''

पलीकडच्या बाजूला आजीच्या फोनचा स्पीकर चालू होता. त्यामुळे आजोबा मोठ्याने म्हणाले, ''मला सुद्धा अमृतसर आणि वाघा बॉर्डर बघायचीच आहे.''

अनुष्काला त्यांचं बोलणं अगदी स्पष्ट ऐकू आलं.

''आणि मला उज्जैन बघायचं आहे,'' आजी म्हणाली. ''मग आता आपण असा बेत करू या की आपण दहा दिवसांत या तीनही ठिकाणांना भेट देऊ. आम्ही याबाबत तुझ्या आईवडिलांशी बोलतो.''

''पण आजी, उज्जैन का?'' अनुष्का म्हणाली.

''ते सगळं मी तुला आपल्या ट्रिपमध्ये समजावून सांगेन,'' आजी म्हणाली. ''भारताच्या इतिहासामध्ये आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेमध्ये या शहराचं महत्त्व खूप मोठं आहे, बरं का!''

''अनुष्का, तू आता मोठी झाली आहेस ना? मग आपल्या

प्रवासासाठीची सगळी ऑनलाईन रिझर्वेशन्स तुला करता येतीलच. मला हे सगळं काही जमत नाही,'' आजोबा आजीकडे बघत हसून म्हणाले.

''तू ऑनलाईन तिकीटं काढ आणि बेताच्या किंमतीच्या पण स्वच्छ आणि सुरक्षित जागी असलेल्या हॉटेलांचं बुकिंग करण्याचा सुद्धा विचार कर. आणि हो, आपल्याला तिथे फिरण्यासाठी टॅक्सीची गरज पडेल, तेव्हा त्याचं सुद्धा बुकिंग करून टाक. अनुष्का, आता आपल्या या ट्रिपची लीडरसुद्धा तूच आहेस, बरं का! आणि या खेपेला आम्ही तुझ्या मागेमागे येणार.''

ते ऐकून अनुष्काचा चेहरा उजळून निघाला.

''आजी, पण कधीतरी मलाही बोलायची संधी देत जा हं." अनुष्का हसून म्हणाली. ''आणि हो, तुम्ही दोघं तुमच्या लंडन ट्रिपच्या तारखा ॲडजस्ट करा, म्हणजे आपल्याला सर्वांना वसंतोत्सवात एकत्र सहभागी होता येईल.''

''वसंतोत्सव म्हणजे काय प्रकरण आहे बुवा?'' आजोबा म्हणाले.

''तो एक २५०० वर्षं जुना असा उत्सव आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या कारकिर्दीमध्ये मेगॅस्थेनीस नावाच्या एका ग्रीक इतिहासकाराने लिहिलेल्या इंडिका नावाच्या ग्रंथामध्ये त्याचा उल्लेख आढळतो. हे नृत्य करणारे नर्तक नेहमीचे अलंकार घालत नाहीत, तर ते फुलांपासून बनवलेल्या माळा, गजरे तसंच इतरही अलंकार घालतात. वसंताच्या आगमनाचं स्वागत करण्यासाठी ते नर्तक रंगीबेरंगी वस्त्रप्रावरणं परिधान करून हे नृत्य सादर करतात. आमिर खुस्रो नावाच्या महान कवीने 'सकलबन' नामक गीताची रचना केलेली आहे. वसंत ऋतूचं आगमन साजरं करण्यासाठी या गीताची रचना करण्यात आलेली आहे.'' ते ऐकून आजोबा गालातल्या गालात हसले.

''तू कुठलाही विषय थेट इतिहासालाच नेऊन भिडवतेस,'' ते म्हणाले. ''खरी हाडाची शिक्षिका आहेस.''

''हो, पण आपल्याला जर इतिहास माहीत नसेल, तर त्याच त्या चुका आपण परत करतो,'' आजी म्हणाली.

त्यावर अनुष्काला हसू फुटलं. आपल्या आजी-आजोबांचं हे गोड, खेळकर भांडण ऐकायला तिला नेहमीच मजा वाटायची.

थोड्याच दिवसांत आजी आणि आजोबा बंगलोरला आले. त्या सर्वांनी एकत्र बसून त्यांच्या ट्रिपची काटेकोरपणे आखणी केली.

अनुष्का आता पंधरा वर्षांची झाली होती, त्यामुळे तिने आपण होऊन या ट्रिपचं नेतृत्व स्वीकारलं. ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी नवनवीन ॲप्स कशी वापरायची, बुकिंग कसं करायचं, नकाशे कसे बघायचे, हे सगळं तिला व्यवस्थित ठाऊक होतं. त्यामुळे तिने त्यांच्या प्रवासाचं अचूक प्लॅनिंग केलं.

त्यांच्या मुक्कामाचं पहिलं ठिकाण होतं इंदूर. तिथे अनुष्काचं आजोळ होतं; तिच्या आईचे आई-वडील तिथे राहत, पण सध्या दक्षिण भारतातली हवा चांगली असल्याने ते त्या भागाच्या दौऱ्यावर गेलेले होते. अनुष्काची ही ट्रीप अगदीच अचानक ठरली होती, त्यामुळे त्यांना त्यांच्या आधी ठरलेल्या बेतात बदल करणं शक्य नव्हतं. ते घरी नसताना त्यांच्या घरी जाऊन राहणं जरा त्रासदायक झालं असतं. त्यात अनुष्काने आणि आजी-आजोबांनी आधी इंदूर पाहिलेलं होतं, त्यामुळे त्यांनी आपल्या या प्रवासात इंदूरला रात्रीचा मुक्काम न करण्याचं ठरवलं.

त्यापेक्षा आपण इंदूर एअरपोर्टवर उतरल्यावर तिथून थेट टॅक्सी करून उज्जैनला जावं, असं त्यांनी ठरवलं. ते रात्रीचा मुक्काम उज्जैनमध्ये करणार होते, आणि दुसऱ्या दिवशी परत पुढील प्रवासासाठी इंदूर एअरपोर्टला येणार होते. त्यांच्या पुढच्या मुक्कामाचं

ठिकाण होतं अमृतसर. अमृतसरहून ते दिल्लीला जाणार होते, त्यानंतर तिथून परतीची फ्लाईट घेऊन ते बंगलोरला परत येणार होते. या दहा दिवसांच्या दौऱ्याची अगदी व्यवस्थित आखणी करून झालेली होती.

अनुष्काच्या आजीने (आईच्या आईने) त्यांना इंदूरमध्ये एका चांगल्या प्रवासी कंपनीची टॅक्सी बुक करण्यात मदत केली.

प्रवासाला निघण्यापूर्वी अनुष्काच्या आई-वडिलांनी तिला आपल्या जवळ बसवून घेतलं.

‘‘अनुष्का, तुला टेक्नॉलॉजीची चांगली समज आहे, म्हणून जास्त वाहवत जाऊ नको, बरं का. आणि हो, आजी आणि आजोबांशी वागताना जरा सांभाळून. ते मोठे आहेत, त्यांना सगळ्या गोष्टी सावकाश कराव्या लागतात. त्यांना त्यांच्या पद्धतीने जपून, सांभाळून सगळं करू दे. जास्त रोख पैसे जवळ बाळगू नका असं मी त्यांनाही सांगणारच आहे. तू सगळी पेमेंट्स ऑनलाईनच कर. उगीच नाही ती खरेदी करत बसू नको, आणि सामानही वाढवू नको. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आजी-आजोबांच्या सहवासाचा आनंद घे, नवनवीन ठिकाणं बघ,’’ उषा म्हणाली.

अनुष्काने मान डोलावली. आपल्या आई-बाबांचं सगळं बोलणं तिने मान्य केलं.

ट्रिपचा दिवस उजाडला. ते सकाळी बंगलोर एअरपोर्टच्या टर्मिनल टूवर येऊन हजर झाले. या टर्मिनलवरून फ्लाईट घेण्याची आजी-आजोबांची ही पहिलीच वेळ होती. विमानतळ किती भव्य आहे हे पाहून आणि तिथला एकंदर सगळा थाटमाट पाहून ते आश्चर्यचकित झाले.

आजोबांवर कोणत्याही गोष्टीचा चटकन प्रभाव पडत असे, ते म्हणाले, ‘‘हे सगळं किती छान आहे! जगभरातल्या लोकांना

आपल्या देशातला विमानतळ बघून असंच वाटेल, की आपणही कुठे कमी नाही आहोत. आपल्या देशाने किती प्रगती केली आहे हे पाहून माझा ऊर तर अभिमानाने भरूनच येतो.''

त्यावर आजी किंचितसं हसली, पण ती काहीच बोलली नाही.

आपल्या आजीवर कुठल्याही गोष्टीचा असा सहजासहजी प्रभाव पडत नाही हे अनुष्काला माहीत होतं. आजी तर्कशुद्ध विचार करणारी आणि व्यवहारी होती. तिचं मन कायम उत्सुकतेने भरलेलं असे. आजीने कित्येक वर्षं इतिहासाची शिक्षिका म्हणून काम केलं होतं, त्यामुळे ती नेहमी प्रश्न विचारायची - गोष्टी या अशा का असतात, हे तिला नेहमी जाणून घ्यायचं असायचं. त्यामुळेच ती ज्या गोष्टी सांगायची, त्यासुद्धा नेहमी जिवंत आणि रसरशीत भासायच्या. तिच्या तोंडून ऐकताना त्या खऱ्या वाटायच्या.

आजी म्हणाली, ''हे इथलं सगळं सुंदर आहे हे तर खरंच, पण ही एवढी हिरवळ, हे बांबूचं स्ट्रक्चर, याची निगा राखणं हेसुद्धा तेवढंच महत्त्वाचं आहे, बरं का!''

चेक-इनची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या हातात त्यांचे बोर्डिंग पासेस मिळाले आणि ते सर्व जण सुरक्षा तपासणीच्या दिशेने निघाले. त्यांच्या विमानाला थोडा उशीर झाला होता. आजी आणि अनुष्का गेटपाशी बसून राहिल्या. आजोबा मात्र विमानतळावर फेरफटका मारायला निघाले. त्यांना विमानतळाच्या संपूर्ण बांधणीचं आणि डिझाईनचं खूपच कौतुक वाटत होतं.

''आजी, मला एक सांग, तुला उज्जैनला का जायचंय? त्या गावाला तर साधा विमानतळसुद्धा नाहीये, तिथे जाऊन पोचणं सुद्धा किती कठीण आहे.''

''अनुष्का, भारताच्या इतिहासामध्ये उज्जैन शहराला एक

महत्त्वपूर्ण स्थान आहे. मी अगदी तरुण असल्यापासून उज्जैनला कधी ना कधीतरी भेट द्यायचीच असं माझं स्वप्न होतं. मी संस्कृत शिकत होते ना, तेव्हा मला भारताच्या महाकवी कालिदासाबद्दल अत्यंत आदर होता. हा कवी मूळचा उज्जैनचाच होता. त्याने इथल्या क्षिप्रा नदीचं, महाकाल मंदिराचं, उज्जैनच्या रस्त्यांचं आपल्या साहित्यामध्ये बऱ्याच जागी वर्णन केलेलं आहे.''

''अच्छा, म्हणून तुला उज्जैन शहराला भेट द्यायची आहे तर?''

''तेवढंच नाही, आणखी एक कारणसुद्धा आहे, पण आपण एकदा तिकडे पोचलो ना, की मी तुला ते सांगेन.''

''महाकाल मंदिर म्हणजे काय? आणि ते इतकं का प्रसिद्ध आहे?'' अनुष्काने विचारलं.

''महाकाल म्हणजेच भगवान शंकर, ही काळाची देवता आहे. या मंदिराला महाकाल मंदिर असं म्हणतात, कारण कोणे एके काळी भारताची खगोलशास्त्रीय मध्यरेषा (भारताच्या प्रमाण वेळेची रेषा) उज्जैन शहरातूनच जात होती. इंग्लंडमध्ये जे ग्रीनविच ठिकाण आहे, अगदी तसंच! महाराज सवाई जयसिंग (दुसरे) यांनी या ठिकाणी एक वेधशाळा बांधलेली आहे.''


"मी तर असं ऐकलं, की कृष्णाचं सगळं शिक्षणसुद्धा उज्जैनमध्येच झालं. हे खरं आहे का गं आजी?" अनुष्काने विचारलं.

''हो, असं म्हणतात की भगवान कृष्ण, बलराम आणि त्यांचा मित्र सुदामा हे उज्जैन नगरीजवळ असलेल्या सांदीपनी आश्रमात शिक्षण घेत होते. ते अत्यंत सुप्रसिद्ध असं गुरुकुल होतं, असं इथले लोक मानतात,'' आजीने अनुष्काला समजावून सांगितलं.

तेवढ्यात विमानाच्या परिचारिकेने सर्वांना विमानात चढण्याचं आवाहन केलं. मग तिघेही विमानात शिरून आपापल्या जागी जाऊन बसले.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# असुर कथा

**आनंद नीलकंठन**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

पृष्ठे : १७२
किंमत : ५९५

### हिरोगिरीचा आव

मुलांनो,

गंमतगोष्टींच्या पुस्तकांना छानसा परिचय असणं खूप महत्त्वाचं असतं, त्यामुळे आपण या कथेपासून सुरुवात करूया.

ही कथा आहे कुंदक्का व मंदक्का नावाच्या दोन छोट्या जुळ्या असुरांची. त्यांना त्यांची आई गुरुकुलात अक्षरश: ओढत घेऊन जात असे, तेव्हा

तिथे काय गोंधळ माजत असेल कल्पना करा!

पूर्वीच्या काळी शाळांना 'गुरुकुल' असं म्हटलं जात असे; पण हे गुरुकुल तुमच्या आत्ताच्या 'हे शिका... ते करा' - असं सांगणाऱ्या आधुनिक शाळांसारखं नसायचं... अनेक उपक्रमांनी खचाखच भरलेल्या आणि त्यामुळे प्रचंड धकाधकीच्या आधुनिक शाळांसारखं नसायचं. खरं सांगायचं, तर गुरुकुल हे अत्यंत सुंदर ठिकाण असे. तुम्ही निसर्गाच्या कुशीत बसून पृथ्वीच्या खंडांविषयी वाचताय किंवा गणितं सोडवताय, अशी कल्पना करू शकता का? हो, अशा गुरुकुलात वर्ग मोठमोठ्या झाडांखाली भरत असत. तोंडाचं बोळकं झालेले प्रसन्न चेहऱ्याचे, पांढरीशुभ्र लांब दाढीवाले आजोबा तिथे शिक्षक असत आणि विद्यार्थी जमिनीवर बसत असत. समजा, नेहमीप्रमाणे तुम्हाला वर्गात कंटाळा आला, (मी असं म्हणाल्याचं तुमच्या आई-बाबांना सांगू नका), तर तुम्ही सरळ झाडाकडे वर पाहू शकायचात, खोड्या काढणारी माकडे पाहू शकायचात, झाडाला लगडणारी फळे खाऊ शकायचात किंवा सरळ वर्गातून सटकू शकायचात! किंवा भाताच्या शेतांवर दूरवर नजर टाकून, नदीत पोहणारा मंदिराचा हत्ती पाहू शकायचात.

या गुरुकुलात गृहपाठ नसे, परीक्षा नसत, सुट्टीचे प्रकल्प नसत आणि चिडखोर शिक्षकही नसत. तिथे मुख्य भर असे तो कथांमधून शिकण्यावर! तिथे गुरू झाडाखाली मांडी घालून बसत आणि नव्या-जुन्या अशा भरपूर गोष्टी सांगत असत. गोष्ट ऐकताना तुमचा डोळा लागला, तरी ते रागवत नसत. हाय... ते दिवस कधीच गेले!

असो, आपण पुन्हा जुळ्या असुर बंधूंकडे - कुंदक्का व मंदक्का यांच्याकडे वळू. अशा शाळेत शिकायला मिळणं, हे आपलं केवढं भाग्य आहे, याची त्यांना कल्पनाही नव्हती. तुमच्या वर्गात अशी काही मुलं असतील (त्यात तुम्ही नक्कीच नसाल; पण कदाचित

इतर काही मुलं असू शकतील) की, ज्यांना अभ्यास ही अतिशय कंटाळवाणी गोष्ट वाटत असेल व ज्यांची शिकण्याची अजिबात इच्छा नसेल. कुंदक्का व मंदक्का अशा मुलांपैकीच होते. हे दोघेजण तुमच्यासारखे हुशार, बुद्धिमान आणि चुणचुणीत नव्हते. अभ्यास करणं किती महत्त्वाचं असतं आणि वर्गात किती मजा येऊ शकते, हे त्यांना माहीतच नव्हतं!

त्या दोघांना अभ्यास अजिबात नको असे. त्यांना त्यांची शाळाही अजिबात आवडत नसे. त्यामुळे, ते रस्त्यातच फतकल मारून... दोन्ही हात छातीवर घेऊन, ओठ काढून फुरंगटून बसत असत. त्यांचे गाल संतापानं लालबुंद झालेले असत. ते बसल्या जागेवरून हलायला नकार देत असत.

''आम्हाला अभ्यास करायचा नाहीये,'' ते दोघं किंचाळत; पण तरी त्यांची आई त्यांचे कान धरून त्यांना रस्त्यावरून दरादरा ओढत शाळेत नेत असे.

मग सगळे जण असुरीला विचारत असत, ''तुम्ही मुलांना असं ओढत का नेताय? आणि मुलं इतकी का चिडली आहेत?''

''या मुलांच्या वांडपणाला मी अक्षरशः विटलीय. सात वर्षांचे झाले आहेत आता आणि गुरुकुलात जायला तयार नाहीत...'' ती मुलांच्या रडण्या-ओरडण्याच्या आवाजापेक्षाही मोठ्या आवाजात किंचाळत सांगत असे.

मग कुंदक्का एखाद्या प्रेमळ असुरीकडे पाहून गळा काढत असे,

''मावशी, मला अभ्यास करायचा नाहीये.''

तर दुसरीकडे मंदक्का मोठ्यानं रडत म्हणत असे, ''आम्ही हिरो आहोत. आम्ही जग जिंकणारच होतो! आम्हाला सगळं माहीत आहे, त्यामुळे आम्हाला आता आणखी काही शिकण्याची, कसला अभ्यास करण्याची आवश्यकता नाही!''

‘‘तुम्ही किती वर्षांचे आहात?’’ रस्त्यावर आंबे विकणाऱ्या एका विक्रेत्यानं विचारलं.

‘‘मी सात वर्षांचा आहे,’’ कुंदक्का रडतरडत म्हणाला, ‘‘माझ्या वाढदिवशीच मंदक्काचा जन्म झाला!’’

‘‘आणि मी सात वर्षांचा आहे,’’ मंदक्का ओरडला, ‘‘कुंदक्काचा जन्मसुद्धा माझ्या वाढदिवशीच झालाय!’’

‘‘हो, बरोबर,’’ दोघं एकत्रच गळा काढत म्हणाले.

‘‘आमचा दोघांचाही जन्म एकमेकांच्या वाढदिवशी झाला आहे, त्यामुळे आम्ही दोघे खूप खास आहोत.’’

‘‘सात वर्षांच्या मुलांनी शाळेत गेलं पाहिजे,’’ तो आंबेवाला डोळे फिरवत म्हणाला.

‘‘हो, एवढ्या मुलांनी शिकलं पाहिजे, अभ्यास केला पाहिजे,’’ भाजीची गाडी ढकलणारी एक म्हातारी बाई म्हणाली.

हे ऐकून त्या जुळ्या भावांना भयंकर संताप आला. त्यांना त्या गाड्यांवर झेप घ्यावी असं वाटत होतं; पण त्यांच्या आईनं त्यांचे कान इतके करकचून घट्ट धरले होते की, त्यांना फरपटत गुरुकुलात जावं लागलं.

‘‘नाही, आम्हाला अभ्यास करायचा नाहीये. आम्हाला सगळं येतं. आम्हाला जग जिंकायचं आहे!’’ मंदक्का गरजला.

‘‘हो, आम्ही खूप हुशार आहोत, बुद्धिमान आहोत, चुणचुणीत आहोत आणि बलवानही आहोत. आम्हाला जगावर राज्य करायचं आहे! पण आईनं आम्हाला सोडलं तर ना....’’ कुंदक्का रडत म्हणाला.

त्यावर रस्त्यावरचे सगळे जण हसू लागले,

‘‘त्यांच्याकडे आईच्या पकडीतून सुटका करून घेण्याइतकीसुद्धा ताकद नाहीये आणि ते जग जिंकण्याची स्वप्नं बघताहेत!

हाहाहाहाहा!''

त्याचा कुंदक्काला राग आला आणि त्यामुळे मंदक्का भडकला. मग कुंदक्कानं आईच्या डाव्या हाताचा चावा घेतला, तर मंदक्कानं उजव्या हाताचा. त्यांची आई वेदनेनं कळवळली आणि तिची पकड सैल झाली. त्याबरोबर या सुवर्णसंधीचा फायदा घेत कुंदक्का घराच्या दिशेनं पळत सुटला. मंदक्का त्याच्यामागून गेलाच. त्यांची आई त्यांच्या या वांडपणाबद्दल त्यांना रागवत त्यांच्या मागून निघाली. हे दृश्य पाहून रस्त्यावरचे लोक हसू लागले. त्याचा कुंदक्काला राग आला. मंदक्काही त्यामुळे भडकला. हे लोक आपल्याला हसतात कसे? शेवटी काहीही असलं तरी, कुंदक्का आणि मंदक्का हुशार, बुद्धिमान, चुणचुणीत आणि बलवान होते!

कुंदक्कानं किंचाळत आंबेवाल्याच्या टोपलीच्या दिशेनं झेप घेत टोपली उलथून दिली आणि पिकलेले आंबे पायदळी तुडवले. त्याबरोबर आंबे चिरडून त्यांचा रस सगळीकडे पसरला.

त्याच्या पाठोपाठ मंदक्कानंही भावाच्या पावलावर पाऊल टाकत आंबे पायदळी तुडवण्याचा प्रयत्न केला; पण तो एका चिरडलेल्या आंब्यावरून घसरून उताणा पडला. मग मंदक्का ओरडत त्याच्या अंगावर कोसळला. हे पाहून रस्त्यावरचे लोक आणखीनच हसू लागले. ते पाहून कुंदक्काला राग आला, त्यामुळे मंदक्का भडकला. त्यांनी त्या म्हाताऱ्या बाईची हातगाडी नाल्यात ढकलण्याचा प्रयत्न केला; पण त्या प्रयत्नात कुंदक्काचा तोल गेला आणि तो नाल्यात पडला.

''अरे, मला बाहेर काढ!'' तो मोठ्यानं रडत म्हणाला.

मंदक्कानं त्याला बाहेर काढण्यासाठी हात पुढे केला; पण ती हातगाडी त्याला मागून येऊन धडकली आणि तो कुंदक्काच्या अंगावर पडला. ते पाहून लोकांना हसू आवरेना. ते पाहून कुंदक्का व

मंदक्का संतापानं वेडेपिसे झाले.

‘‘बंद करा हे, मूर्ख कुठले!’’ त्यांची आई काकुळतीला येऊन ओरडत होती; पण हे दोघं कधीच ऐकत नसत.

नाल्यातल्या दुर्गंधीयुक्त घाणेरड्या पाण्यात निथळणारे कुंदक्का व मंदक्का सगळ्यांकडे बघत उभे होते. मग कुंदक्कानं मंदक्काच्या कानात काहीतरी सांगितलं आणि ते दोघंही हसू लागले. त्यानंतर ते दोघं लोकांच्या दिशेनं निघाले... नुकताच एखादा गलेलठ्ठ उंदीर हेरलेल्या मांजरासारखं रुंद हसत. मग ते दोन्ही हात पुढे करून दबक्या पावलांनी लोकांच्या दिशेनं निघाले. नाल्यातलं दुर्गंधीयुक्त पाणी त्यांच्या बोटांतून ठिबकत होतं.

आहोत आम्ही गोबरे... आहोत किती गोंडस
आहोत आम्ही छानछान... फळांसारखे गोड
घ्या आम्हाला कुशीत... आणिक द्या पापा
हुकलं म्हणून नंतर ... हळहळू नका!

आता रत्यावरचे लोक आरडाओरडा करत, किंचाळत सैरावैरा धावू लागले... कोंबडीच्या भयभीत झालेल्या पिल्लांसारखे.

ते पाहून कुंदक्का व मंदक्का खदाखदा हसू लागले आणि ‘‘पापा देऊ का, मिठी मारू का’’ असं म्हणत सगळ्यांच्या मागे लागले. भाजीवाला एका खांबावर चढला आणि कावळ्यासारखा तिथेच बसून राहिला. आंबेवाला वडाच्या झाडामागे लपला. अंडीवाला गाणे म्हणत रस्त्यावरून सावकाश निघाला होता; पण सगळ्या गोंधळात चेहऱ्यावर दुष्ट हास्य असलेली ही जोडी पाहून तो थबकलाच. ते दोघंही नाल्यातल्या घाणीनं बरबटलेले होते, त्यांना नाल्याचाच वास येत होता. अंडीवाला त्यांना पाहून एक पाऊल मागे सरकला, तर कुंदक्का-मंदक्का त्याच्या दिशेनं एक पाऊल पुढे सरकले. त्यावर तो अंडीवाला दोन पावलं मागे सरकला, तर कुंदक्का-मंदक्का तीन

पावलं पुढे सरकले.

''आहोत आम्ही गोबरे... हो ना?'' कुंदक्का एक पाऊल पुढे सरकत म्हणाला.

''अं...'' अंडीवाला घाबरून एक पाऊल मागे सरकत ओरडला.

''आहोत किती गोंडस... हो ना?'' मंदक्कानं दोन पावलं पुढे जात विचारलं.

''मला नाही वाटत तसं!'' अंडीवाला डोक्यावरची अंड्यांची टोपली सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करत तीन पावलं मागे सरकला.

''आहोत आम्ही छान छान... हो ना?''

''नाही, मी नाही म्हणणार तसं!''

''फळांसारखे गोड?''

''नाही, नाही, नाही,'' अंडीवाला सुटकेसाठी रस्ता शोधत म्हणाला.

कुंदक्का आणि मंदक्का एकमेकांकडे पाहत खिदळले. ते सुरात सूर मिसळून गात होते...

''घ्या आम्हाला कुशीत ... आणिक द्या पापा
हुकलं म्हणून नंतर ... हळहळू नका!''

मग त्यांनी बिचाऱ्या अंडीवाल्याच्या दिशेनं कूच केलं, तसा तो भीतीनं किंचाळला.

''अय्यो, अय्यो, अय्यो ऽऽऽ...'' अंडीवाला पळत सुटला.... जोरात पळत सुटला. कुंदक्का आणि मंदक्का त्याच्यामागून धावत होते... त्यांचं गाणं म्हणत धावत होते. ते अंडीवाल्यापर्यंत पोहोचण्याच्या आत कुंदक्काच्या अंगावर एक पोतं पडलं. पाठोपाठ मंदक्काच्या अंगावर दुसरं पोतं पडलं. भाजीवाला व आंबेवाला या दोघांनी हळूच येऊन या जोडीला पकडलं होतं. आहा! कुंदक्का-मंदक्का पोत्यातून बाहेर येण्यासाठी धडपडत होते, आरडाओरडा

करत होते, किंचाळत होते,

‘‘कोणी पकडलंय आम्हाला... कुणाची इतकी हिंमत झालीय! सोडा आम्हाला!’’

पण शेवटी, काहीही करता येत नाही म्हटल्यावर त्यांनी त्यांचा सूर बदलला,

‘‘आम्हाला शाळेत जायचं नाहीये. आम्हाला जग जिंकायचंय, कृपा करून आम्हाला बाहेर येऊ द्या.’’

तेवढ्यात त्यांनी त्यांच्या आईचा आवाज ऐकला, ‘‘छान. आता या दोघा भुतांना गुरूकडे घेऊन जाऊ या. तेच यांना चार धडे देतील.’’

कुंदक्का-मंदक्का अंधाऱ्या पोत्यातून बाहेर पडण्याची धडपड करत मुसमुसत रडत होते; पण व्यर्थ! मग त्यांना भाजीवाल्याच्या हातगाडीवर ठेवण्यात आलं. त्यांची आई हातगाडी ढकलत होती. भाजीवाला तिच्या मदतीला आला होता, आंबेवालासुद्धा मदतीला आला. त्यानंतर अंडीवाला आला. काही वेळातच बरेच लोक आले आणि कुंदक्का-मंदक्काची पोती मिरवणुकीनं गुरूच्या घराच्या दिशेनं निघाली.

ही वरात गुरूच्या घरी आली, तेव्हा ते झाडाजवळ विद्यार्थ्यांना शिकवत होते. दुर्गंधी येणारी दोन पोती वाहून आणणारी हातगाडी जवळ येताच विद्यार्थ्यांनी नाकं मुरडली. गुरूजवळ येताच हातगाडी थांबली आणि कुंदक्का-मंदक्काच्या आईनं गुरूचे पाय धरले.

‘‘गुरुजी, मला मदत करा. माझी मुलं फार खोडकर आहेत. त्यांची काहीही शिकण्याची इच्छा नाहीये!’’

‘‘मी त्यांना शिकवीन; पण ते आहेत कुठे? आणि ही दुर्गंधी कसली?’’ गुरूंनी भुवया उंचावून नाक आक्रसत विचारलं.

त्याबरोबर भाजीवाला व आंबेवाला, दोघांनीही वाटच बघत असल्यासारखं पोतं उघडलं आणि मंदक्का-कुंदक्का धप्पकन बाहेर

पडले. सगळे विद्यार्थी नाक चिमटीत धरून ओरडले,

‘‘श्शी! थू ऽऽ!’’

कुंदक्का - मंदक्कानं आजूबाजूला पाहिलं. एकदम उजेडात आल्यामुळे त्यांचे डोळे मिचमिचत होते. त्यांनी पाहिलं की, सगळे विद्यार्थी नाक चिमटीत धरून बसले आहेत. ते पाहताच अचानक त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुललं.

त्यांनी त्यांचं गाणं सुरू केलं :

*आहोत आम्ही गोबरे... आहोत किती गोंडस*
*आहोत आम्ही छान छान... फळांसारखे गोड*
*घ्या आम्हाला कुशीत... आणिक द्या पापा*
*हुकलं म्हणून नंतर... हळहळू नका!*

हे गाणं मजेत गात ते दोघं विद्यार्थ्यांच्या दिशेनं पळत सुटले; पण ही घाबरलेली जोडी पळतापळता एकमेकांच्या अंगावर पडली व आरडाओरडा करू लागली. अकस्मात, या दोघांसमोर गुरू उभे राहिले.

मग या दोघांनी त्यांनासुद्धा हे गाणं म्हणत घाबरवण्याचा प्रयत्न केला. त्यांना गुरूंनी पळून जाणं अपेक्षित होतं; पण गुरूंनी दोन्ही हात पसरून, त्या दोघांच्या अंगाला भयानक दुर्गंधी येत असूनही त्यांना घट्ट जवळ घेतलं. गुरूंनी त्यांच्या गोबऱ्या गालांचा गालगुच्चा घेतला आणि त्यांना कौतुकानं म्हणाले,

‘‘हो, अर्थातच. तुम्ही देखणे, चांगले आणि फळासारखे गोडम्‌गोड आहातच.’’

एवढंच नव्हे, तर गुरूंनी त्यांचा पापासुद्धा घेतला. या गोष्टीची कुंदक्का-मंदक्काला भयंकर लाज वाटली.

‘‘आम्हाला अभ्यास करायचा नाहीये,’’ मंदक्का रडतरडत म्हणाला. त्याला वाटलं की, हे म्हातारे आजोबा आपल्याला युक्तीनं अभ्यास करायला लावण्याचा प्रयत्न करत आहेत.

‘‘छे, छे. तुम्हाला अभ्यास करायला कोण सांगतंय?’’ गुरू आजोबा त्या दोघांना नदीच्या दिशेनं नेत म्हणाले.

‘‘आम्हाला जग जिंकायचंय,’’ कुंदक्का पुन्हा म्हणाला. एव्हाना ते नदीजवळ पोहोचले होते.

‘‘तुम्ही नक्की जग जिंकू शकाल,’’ म्हातारे असुर गुरू स्मित करत म्हणाले.

‘‘आम्हाला गणित शिकायचं नाहीये!’’ मंदक्कानं सांगितलं.

‘‘मुळीच नाही, मी तुम्हाला गणित शिकवण्याच्या फंदात पडणारच नाही. अजिबात नाही.’’

‘‘आणि व्याकरण पण...’’ कुंदक्का ओरडला.

‘‘मुळीच नाही... मुळीच नाही. तुम्हाला व्याकरणाचा अभ्यास करायला कोण सांगतंय?’’

‘‘किंवा भूगोलसुद्धा!’’ मंदक्का ओरडला.

‘‘राज्यंबिज्यं असलं सगळं! श्शी!’’

‘‘आणि समाजशास्त्रसुद्धा,’’ कुंदक्कानं आणखी भर घातली.

‘‘हो, हो, मी त्याची तुम्हाला कधीही सक्ती करणार नाही,’’ असं म्हणून गुरू हसले आणि त्यांनी कुंदक्का-मंदक्काला हळूच पाण्यात ढकललं.

‘‘सगळ्यात आधी आपण पोहायला शिकू या,’’ गुरू त्यांच्यासोबत पाण्यात उडी घेत म्हणाले,

‘‘आणि त्यानंतर आपण फक्त छान-छान जुन्या गोष्टी ऐकू!’’

◆

## १६ मे ते १५ जून २०२५ दरम्यानचा दिनविशेष
## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५०टक्क्यांपर्यंत सूट

### खालील संचांवर १६ ते ३१ मे दरम्यान खास सवलत

**१७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन**

'आपण आपले ताणतणाव-एक चिंतन','हितगूज–तणावयुगातील तरुण पिढीशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१८ मे - मृणालिनी सावंत यांचा जन्मदिन**

'उत्तुंग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५५३/-**

---

**२४ मे - राजदीप सरदेसाई यांचा जन्मदिन**

'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२५ मे - गणेश मानुगडे यांचा जन्मदिन**

'बाजिंद', 'धना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत ३०५/-**

---

**२८ मे - इयान फ्लेमिंग यांचा जन्मदिन**

'फ्रॉम रशिया विथ् लव्ह', 'गोल्डफिंगर', 'ऑक्टोपसी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२९ मे - जागतिक शांतताप्रिय दिवस**

संच १ - 'मी मलाला', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'मदर टेरेसा' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत १०४०/- । सवलत किंमत ६७६/-**

संच २ - 'मोहनदास', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी,' 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'बापूजींची अमर कहाणी', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत २०६५/- । सवलत किंमत १५४९/-**

संच ३ - ‘तथागत गोतम बुद्ध’

**मूळ किंमत १५९५/- । सवलत किंमत ११९६/-**

**२९ मे - फारुक एस. काझी यांचा जन्मदिन**

**‘चुटकीचं जग’** या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३७/-**

**३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन**

‘कर्मयोगिनी’, ‘सतिसाध्वी देवी अहिल्या’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४६५/-

KARMAYOGINI (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत १७९/-**

**३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन**

‘एका परिसाची कथा’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**खालील संचांवर १जून ते १५ जून दरम्यान खास सवलत**

**१ जून - ल. सि. जाधव यांचा जन्मदिन**

‘अडगळ’, ‘धर्मवेध’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४६२/-**

**१ जून - राजन गवस यांचा जन्मदिन**

‘आपण माणसात जमा नाही’, ‘भंडारभोग’, ‘चौंडकं’, ‘रिवणावायली मुंगी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११२०/- । सवलत किंमत ८२०/-**

**१ जून - बा. ग. केसकर यांचा जन्मदिन**

‘डव्हाळं’, ‘सुर्वंता’या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**१ जून - दादासाहेब मोरे यांचा जन्मदिन**

‘गबाळ’, ‘अंधाराचे वारसदार’, ‘विमुक्त’, ‘दुस्काळ’ या पुस्तकांवर विशेष

सवलत

**मूळ किंमत ८४०/- । सवलत किंमत ५०४/-**

**१ जून - लक्ष्मण माने यांचा जन्मदिन**

'उपरा', 'किटाळ', 'पालावरचं जग', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'बंद दरवाजा', 'भटक्याचं भारूड', 'उद्ध्वस्त', 'यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका', 'विमुक्तायन', 'का कराचं शिकून?', 'क्रांतिपथ', 'रेषेपलीकडील लक्ष्मण', 'प्रकाशपुत्र', 'अनिल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४०४०/- । सवलत किंमत ३०३०/-**

**१ जून - वसंत गायकवाड यांचा जन्मदिन**

'तथागत गोतम बुद्ध', 'चितेवरच्या कळ्या' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत १९४५/- । सवलत किंमत १३६२/-**

**४ जून - आनंद कान्हेरे यांचा जन्मदिन**

'मॅस्वी कान्हेरे' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ जून-जागतिक निष्पाप मुलांचा क्रूर बळी दिवस**

संच १-'हरवलेले बालपण', 'झोंबी', 'खाली जमीन वर आकाश', 'वेस्टेड', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट', 'बिलाँगिंग' 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७६५/- । सवलत किंमत २३३३/-**

संच २ - 'डिनायल', 'द डायरी ऑफ मेरी बर्ग', 'वेदनेची फुले', 'मी मलाला', 'लव्हिंग नॅटली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५०५/- । सवलत किंमत ९१५/-**

**५ जून - जागतिक पर्यावरण दिवस**

संच १ - 'वसुंधरा', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'आपली सृष्टी १० पुस्तकांची मालिका', 'वायू प्रदूषण', 'विपुलाच सृष्टी', 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९३०/- । सवलत किंमत १८७५/-**

संच २ - 'केल्याने होत आहे रे!', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अंतरिक्षाचा वेध', 'अवनी एक नवी', 'कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम!', 'हरित युद्धे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७१५/- । सवलत किंमत १२०१/-**

**५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन**

'ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स', 'आय ऑफ द निडल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११५०/- । सवलत किंमत ७६३/-**

---

**६ जून - एम. जे. हायलंड यांचा जन्मदिन**

'कॅरी मी डाऊन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**८ जून - रामचंद्र खाटमोडे यांचा जन्मदिन**

'सर्जा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन**

किरण बेदी यांच्या अकरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३०४५/- । सवलत किंमत २२८४/-**

---

**१० जून - बाबाराव मुसळे यांचा जन्मदिन**

'वारूळ', 'नो नॉट नेव्हर', 'हाल्या हाल्या दुधू दे!', 'झुंड', 'झिंगू लुखू लुखू', 'मोहरलेला चंद्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४७५/- । सवलत किंमत १९५५/-**

---

**११ जून - जॉर्जिना हार्डिंग यांचा जन्मदिन**

'हेरगिरीचा पोरखेळ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २७८/-**

---

**१२ जून - ॲन फ्रँक यांचा जन्मदिन**

'डायरी ऑफ ॲन फ्रँक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन**

संच १ - 'हरवलेलं बालपण', 'खाली जमीन वर आकाश', 'सर्चिंग फॉर डॅडी', 'शेम', 'हिरॉइन ऑफ द डेझर्ट', 'वेदनेची फुले', 'शॅपेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १३९४/-**

संच २ - 'झोंबी', 'वेस्टेड', 'बिलाँगिंग', 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २८२५/- । सवलत किंमत १८९३/-**

**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**

भा. द. खेर यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८३१५/- । सवलत किंमत ५९७८/-**

**१४ जून - जी. डी. मोरे यांचा जन्मदिन**

A Methodical English Grammar या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१५ जून-अण्णा हजारे यांचा जन्मदिन**

'अण्णा हजारे', 'लढा लोकपालचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १८७/-**

◆

**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

author@mehtapublishinghouse.com

## कोल्हापूर येथील ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या ग्रंथदालनाच्या उद्घाटन प्रसंगीची क्षणचित्रे



RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/05/2026 Posting Date : 11/05/2026




**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________